१९६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २१०६

ाथकृत

# हरी

कवि वामन पंडित व श्री. ल. गो. विंझे यांच्या
समवृत्त, समश्लोकी व मराठी गद्य भाषांतरासह

संपादक
ल. गो. विंझे

REFBK-0013510
REFBK-0013510

बलवन्त पुस्तक भाण्डार,
गिरगांव नाका, मुंबई ४

नों.क्र. ५५०८८
५।९।५७
काव्य
सन १९६३

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम. ५५०८८ वि: काव्य
क्रमांक २१०६ नों. दि ५।९।५७

श्री सरस्वती महोत्सवांत (वर्गाने)
चर्चेत 'संस्कृत' मधून बाजू
मांडल्याबद्दल प्रथम क्रमांकाचे
पारितोषिक कुमारी मंगला ग. आठवले.
दिनांक १८.१०.६८

[illegible]. पराडकर.

मुख्याध्यापक.
सरस्वती ज्ञान मंदिर.
(संस्कृत पाठशाळा)
श्री कौपीनेश्वर मंदिरावरील सभागृह, ठाणें.

पंडित जगन्नाथकृत

# गंगालहरी

कवि वामनपंडित व श्री. ल. गो. विंझे
यांच्या समवृत्त समश्लोकी व मराठी गद्य भाषांतरासह.
( शेवटीं पाठभेद-चर्चेचें विवेचक परिशिष्ट जोडलें आहे. )

संपादक :
ल. गो. विंझे

प्रस्तावना :
प्रा. नीलकंठ शंकर नवरे,
बी. ए. ( ऑ. ), बी. टी.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 13490

REFBK-0013510
REFBK-0013510



बलवन्त
प्रकाशन
गिरगांव मुंबई

प्रकाशक :
**त्र्यंबक विष्णु परचुरे,**
बलवंत पुस्तक भाण्डार,
गिरगांव, मुंबई ४,

आवृत्ति दुसरी—
वर्षप्रतिपदा शके १८८५

६८
सन १९६३

*

मुद्रक :
शि. गो. भावे, मॅनेजिंग् डायरेक्टर्,
विमा मुद्रक आणि प्रकाशक लिमिटेड्,
सातारा, यांचा विमा छापखाना.

*

कव्हर् छपाई :
सर्वोदय प्रिंटर्स्, मुंबई ४

*

ब्लॉक्स् :
मेसर्स् गुप्ता ब्रदर्स्, मुंबई १२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

# भाषांतर-कर्त्याचे दोन शब्द—

श्रीगंगालहरी हें अत्यंत लोकप्रिय ' सर्वांमुखीं ' असलेलें स्तोत्र, आधुनिक संस्कृत कवींचा मुकुटमणि जगन्नाथ पंडित, यानें रचिलें. आंध्रांतील वेंगिनाडी गांवच्या पेरुभट्ट व सौ. लक्ष्मीबाई, या तेलंगी ब्राह्मण दांपत्याच्या पोटीं, इ. स. १५५०त त्याचा जन्म झाला. जात्या बुद्धिमान् असल्यानें लहान वयांतच, शास्त्राभ्यास करून संस्कृत भाषेचा तो पंडित झाला. त्याचें लग्नहि लहानपणींच झालें. पत्नी भामिनी हीहि रसिक व विदुषी निघाली; पण ती लौकरच निवर्तली. ' भामिनीविलास ' हें काव्य जगन्नाथानें हिच्याच स्मरणार्थ लिहिलें. कर्नाटकांत व महाराष्ट्रांत ह्याच्या कवित्वाचें व पांडित्याचें योग्य कौतुक न झाल्यानें हा उत्तरेस गेला; व जयपूरच्या राजा भगवानदासानें यास आश्रय दिला. तेथें वारंवार विद्वत्सभा व शास्त्रार्थवाद होत. त्यांत जगन्नाथानें अनेक विजय मिळविले व अकबराच्या कानीं त्याची कीर्ति गेली. अकबरासहि धार्मिक वादांची हौस, म्हणून त्यानें आपल्या पदरच्या काजींशीं वाद करण्यास जगन्नाथास बोलाविलें. भर दिल्लीदरबारांत हा वाद होऊन जगन्नाथानें काजींचा पूर्ण पराभव केला. या दिग्विजयाबद्दल अकबरानें, वस्त्रें, अलंकार व ' पंडितराय ' ही पदवी देऊन जगन्नाथाचा बहुमान केला. जयपूरनरेश हा अकबराचा मांडलिक. त्याची बहीण भानुमती ही अकबराची पत्नी. अकबरानेंच जयपूरराजापासून जगन्नाथाला मागून घेऊन आपल्या दरबारीं ठेविलें. राणी भानुमतीपासून अकबरास झालेली मुलगी भामिनी. हिला लवंगी म्हणत. हिला संस्कृत शिकविण्याच्या कामावर जगन्नाथाची नेमणूक झाली. या शिष्येवर गुरूचें प्रेम बसलें. जगन्नाथानें प्रसंगाप्रसंगानें केलेल्या उत्स्फूर्त काव्यांनीं अकबर प्रसन्न होई. अशाच एका प्रसंगाची संधि साधून जगन्नाथानें त्याच्याकडे लवंगीची मागणी केली : " न याचे गजालिं, न वाजिराजिं, न वित्तेषु चित्तं मदीयं कदाचित् । इयं सुस्तनी मस्तकन्यस्तकुंभा

लवंगी कुरंगीदृगंगीकरोतु ॥" अकबरानें प्रसन्न होऊन कन्यादान केलें व त्यांचा विवाह झाला. पुढें अकबर वारल्यावर जहांगीर, व, नंतर, शहाजहाँ यांचाहि जगन्नाथास आश्रय होता. तरीपण यवनीशीं लग्न केल्याबद्दल पुराणमतवादी लोकांनीं त्याचा फार छळ केला. शेवटीं जगन्नाथ व लवंगी यांनीं, काशीस आत्मवीरेश्वराच्या घाटावर, ( यालाच जगन्नाथाचा घाट म्हणतात व त्याला ५२ पायऱ्या आहेत. ) या गंगालहरीचीं भक्तिभावानें पारायणें केलीं, व, एकेका श्लोकाबरोबर, गंगेचें पाणी एकेक पायरी वर चढत येऊन, या दोघांना स्पर्शानें पावन करून, सदेह वाहून नेऊन, गंगामाईनें आपल्या पोटांत घेतलें. या चमत्कारावरून त्यांच्या पावित्र्याविषयीं खात्री पटून, त्यांचा छळ केल्याबद्दल पुराणमतवाद्यांना पश्चात्ताप झाला. अशी दंतकथा आहे.

जगन्नाथानें रचिलेलीं काव्यें, स्तुतिस्तोत्रें व शास्त्रीय ग्रंथ मिळून १७–१८ आहेत. पैकीं गंगालहरी ( पीयूषलहरी ), अश्वधाटी, भामिनीविलास इत्यादि काव्यें व रसगंगाधर हा वाङ्मयशास्त्रीय ग्रंथ हीं फार प्रसिद्ध आहेत. म्हणतात कीं, ऐतिहासिक काळांत १०–१२ जगन्नाथ पंडित झाले. त्यामुळें या १८ काव्यग्रंथांपैकीं खरोखर या जगन्नाथाचे ग्रंथ किती, तें सांगणें कठिण.

जगन्नाथाचें काव्य अत्यंत पदलालित्यमंडित व मधुर आहे. " प्रसादगुणाचें उत्तम उदाहरण म्हणजे माझीं बहुतेक काव्यें. " असें हा अभिमानानें सांगतो. रसगंगाधर ग्रंथांत विविध रसांचीं उदाहरणें म्हणून हा स्वतःचींच काव्यें देऊन म्हणतो– " मी लोकांचीं काव्यें उसनीं कशाला घेऊं ? कस्तूरिका उत्पन्न करूं शकणारा मृग फुलांचा वास कशाला घेईल ? " तसेंच " स्थितिं नो रे दध्याः ", " दिगन्ते श्रूयन्ते " इत्यादि अन्योक्तींतून दिसून येणारा त्याच्या अहंकाराचा दर्प विलक्षणच; पण तोहि त्याला शोभून दिसावा, इतकें त्याचें काव्य सुंदर आहे, यांत शंका नाहीं. या गंगालहरींतसुद्धां [श्लोक ३६ व ४७ यांत] जगन्नाथ हें स्वतःचें नांव व 'मी जगाचा नाथ' अशा द्व्यर्थी उल्लेखाची अहंकारी ऐट दिसून येते. अहंकाराबरोबर रंगेलपणा हा जगन्नाथाचा सार्वत्रिक विशेष आहे. प्रस्तुत भक्तिपर

काव्यांतसुद्धां [ श्लोक ७ ] नृपतिरमणीनां कुचतटी; [ श्लोक २० ] सुरस्त्री-वक्षोज यांचा उल्लेख केल्याविना त्याला राहवलें नाहीं. अनुप्रासांचा तर हा नुसता पाऊस पाडतो. दुसऱ्या श्लोकांतील 'द' अक्षराचें उदारपणें केलेलें दान; श्लोक ३ व ५२ यांत 'अंग' पदांचा उधळलेला रंग; १८ व्या श्लोकांत 'धान' पदांची समाधानकारक लयबद्धता व २० व्या श्लोकांत 'ल' अक्षराचें लुसलुशीत लालित्य पाहण्याजोगें आहे. अनुप्रासांच्या बाबतींत 'गीतगोविंद'-कर्ता जयदेवच काय तो जगन्नाथाच्या तोडीचा ठरेल. शिखरिणी वृत्त याचें आवडतें असावें; ओळींतल्या ५ व ६ व पुढें १२ व १३ या अक्षरांत समान ध्वनिपदें योजून अनुप्रासांत तालबद्धता आणणें हें याचें वैशिष्ट्य दिसतें. पहा—श्लोक २ [ओळ ४]; श्लोक ३ [ओळ ४]; श्लोक ५ [ओळ २ व ४]; श्लोक ८ [ओळ १ व २] इत्यादि. शब्द व रचना यांच्या चमत्कृतीच्या या हौशीपायीं बऱ्याच ठिकाणीं कृत्रिमताहि येते. माझ्या दृष्टीनें भक्तिभावाची विशेष आर्तता श्लोक ४,८,२४,३०,३६,३८,३९,४१, ४६ इत्यादि यांत दिसते. २८ व्या श्लोकांतील 'करं कर्णे कुर्वन्त्यपि' इत्यादींची, मोरोपंतांनीं आपल्या केकावलींत "कर श्रवणिं ठेविते" इत्यादि नक्कल केलेली सुप्रसिद्धच आहे.

समासालंकारप्रचुर अतएव अल्पशब्दांत बह्वर्थ अशा संस्कृत काव्यांचें भाषांतर व त्यांतून समवृत्त समश्लोकी करणें अत्यंत अवघड. आधींच वामनासारख्या महाकवीनें समवृत्त समश्लोकी केलेली. तेव्हां त्याचे शब्द, त्याची वाक्यरचना, त्याचीं यमकें टाळून पण तोच अर्थ शक्य तितक्या सोप्या भाषेंत आणणें हा दुहेरी अवघडपणा! या अडचणी व बंधनें स्वीकारून मीं केलेला हा अल्पप्रयत्न कितपत साधला आहे, हें अर्थात् संस्कृतज्ञ पंडित व रसिकांनींच ठरवायचें आहे.

८२ खटाव बिल्डिंग,
लालबाग–मुंबई १२
कार्तिक शु. १, शके १८७८

—ल. गो. विंझे

# धांवतें दर्शन !

" तुम्ही विद्यार्थी दिसतां ? "

" होय. "

" कोणत्या देशांतून आलांत ? "

" हिंदुस्थानांतून आलों मी. "

" आं ! जिथें गंगा नदी आहे त्या देशचे तुम्ही ! मोठे भाग्यवान आहां. हिमालय पर्वतहि तुमच्या देशांत आहे ! "

अशा प्रकारचीं प्रश्नोत्तरें, जर्मनींतला बूट शिवणारा एक चांभार, आणि तिकडे पीएच्. डी. साठीं गेलेला, आपल्याकडील एक हिंदी विद्यार्थी, यांच्यामध्यें झालीं होतीं. फर्ग्युसन् कॉलेजांतील आमचे संस्कृतचे प्रोफेसर कै. डॉ. पांडुरंग दामोदर गुणे, यांनीं, आपला अनुभव म्हणून ही गोष्ट सांगितली होती.

गंगेची कीर्ति सातां समुद्रांपलीकडे गेलेली आहे. " ऐसें माहात्म्य गंगेचें !" त्रिभुवनांत गाजलेली ही नदी ! आकाशांत वाहणारी स्वर्गंगा, पृथ्वीवर वाहणारी भागीरथी, पाताळांत वाहणारी भोगावती - गंगेचें असें त्रिविध रूप आहे.

**इमं मे गंगे यमुने सरस्वति,**
**सितासिते सरिते यत्र संगते ।**

अशा प्रकारचें वर्णन वैदिक ऋषींनीं केलें आहे. काशीच्या भागीरथींत तर सर्व नद्यांचें पावित्र्य सांठविलें आहे. पुराणकालांत तीर्थक्षेत्रांचें माहात्म्य किती तरी वाढलें. किती तरी कवींनीं, गंगेचें स्तोत्र भक्तिभावानें गाइलें आहे. आद्य-कवि वाल्मीकींनीं " मातः शैलसुतासपत्नि ...... त्वन्नाम

स्मरतरूत्वदर्पितदृशः स्यान्मे शरीरव्ययः ।" अशी गंगामातेची करुणा भाकली आहे. कालिदास आणि शंकराचार्य यांनींहि गंगाष्टकें रचिलीं. भर्तृहरीनें आपल्या वैराग्य-शतकांत " कदा वाराणस्याम् अमरतटिनी-रोधसि वसन्" इ. श्लोकांत 'मला गंगेच्या कांठीं केव्हां राहावयास मिळेल?' अशी व्याकुळता प्रकट केली आहे.

भगीरथानें, आपल्या पितरांच्या उद्धारासाठीं, गंगेला स्वर्गातून पृथ्वीवर आणलें. तेव्हांपासून तिला 'भागीरथी' हें नांव प्राप्त झालें, शंकरानें तिला आपल्या मस्तकावर, माळेप्रमाणें, धारण केलेली असल्यानें, कोणत्याहि नदीला प्राप्त न झालेलें उच्चस्थान, गंगेला प्राप्त झालें. गंगा-यमुनांच्या संगमाची महती तर विचारूंच नका. या संगमांत स्नान केल्याचें पुण्य मोठें आहे, त्यायोगें ज्ञानाशिवायदेखील मानवाला मोक्ष प्राप्त होतो, असें कालिदासानें रघुवंशांत वर्णन केलें आहे. केवळ सौंदर्यदृष्टीनें पाहिलें, तरी, "इंद्रनील आणि मोत्यें यांचे एके ठिकाणीं मांडलेले जणूं सरच !" असें कालिदासानें गंगायमुना-जोडीचें यथार्थ शब्दचित्र रेखाटलें आहे.

**गंगा गंगेति यो ब्रूयाद् योजनानां शतैरपि ।**
**मुच्यते सर्वपापेभ्यो विष्णुलोकं च गच्छति ॥**

गंगा शेंकडों योजनें दूर असली, तरी, तिच्या केवळ नामस्मरणानें आम्हांला मोक्ष प्राप्त होतो, अशी आमची भावना. किंबहुना तिच्याकडे जाण्याची आवश्यकताहि नाहीं. आमच्या स्नानगृहांतच आम्हीं गंगालय ( गंगाळ ) आणून ठेविलें आहे !

विख्यात पंडित कवि जगन्नाथ यांनीं 'गंगालहरी' नांवाचें काव्य लिहिलें. त्यांत करुण स्वरानें गंगेची प्रार्थना केली आहे. " मी पतितापेक्षां पतित आहें; तूंच माझा आधार; तूं लवकर ये आणि माझा उद्धार कर." हाच काय तो या काव्याचा थोडक्यांत आशय. जगन्नाथ-पंडितांच्या

तोडीचेच वामनपंडित ( १६३६ ते १६९५ ) यांनी गंगालहरीला ' देशीकार लेणें ' चढविलें. वामनपंडित हे आद्य सुश्लोककार. रामायण, महाभारत, भागवत यांतील कितीतरी आख्यानें पंडितांनीं मराठींत आणलीं. आख्यान-कवींमध्यें त्यांचें स्थान अढळ आहे. वामनपंडितांच्या काव्याची माधुरी अवीट. त्यांचें काव्य म्हणजे जणूं भगवान् श्रीकृष्णानें वाजविलेला पावाच ! पंडित जगन्नाथराय आणि त्यांच्या काव्याचा अनुवाद करणारे वामनपंडित या दोघां पंडितांचा ' समसमां संयोग कीं जाहला ' ! पांडित्य आणि कवित्व यांचा दुर्लभ संगम या दोघां कवींत सारखाच दिसून येतो.

वामनपंडितांनीं, गंगालहरीचें समश्लोकी भाषांतर केलें असतां, आणखी एका समश्लोकीची काय आवश्यकता आहे, असें कोणी विचारील. त्यांना एवढेंच सांगावयाचें कीं, कालिदासाच्या मेघदूताप्रमाणें, जगन्नाथाचें गंगालहरी काव्य रसभरित आहे. त्याचा अनुवाद आपण करावा, अशी अनिवार इच्छा, कोणाहि कवीस होणें, साहजिक आहे. हा गंगेचा प्रभाव !

कोणत्याहि काव्याचा अनुवाद करतांना, चार–पांच कसोट्या डोळयांसमोर उभ्या राहतात.

(१) अनुवादकानें मुळांतील आशय संपूर्णतः अनुवादांत आणला पाहिजे.

(२) मुळांत नसलेलें कांहींहि त्यानें अनुवादांत आणतां कामा नये. ' नामूलं लिख्यते किंचित् ' हा दंडक त्यानें पुढें ठेवावा.

(३) अनुवाद हा सुबोध म्हणजे वाचकांस सहज समजेल, असा असावा. त्याला तो इतरांकडून समजावून घेण्याची पाळी येऊं नये.

(४) ज्या भाषेमध्यें अनुवाद केला असेल, त्या भाषेची धाटणी, त्यानें अनुसरली पाहिजे.

(५) मुळांतील रचनासौन्दर्य, कल्पनासौन्दर्य व अर्थसौन्दर्य यांची प्रतीति अनुवादामध्यें वाचकास यावी.

माझे स्नेही श्री. ल. गो. विंझे यांनी गंगालहरीचा अनुवाद करतांना वर सांगितलेलें 'पंचशील' कांटेकोरपणानें पाळलें आहे, असें मी निस्संदेहपणें म्हणतों. संस्कृत भाषा ही समासबहुल आहे. तींत समासांच्या सोयीमुळें थोड्या जागेंत पुष्कळ अर्थ आणतां येतो. पण मराठी समश्लोकींत तेवढा अर्थ आणणें महादुर्घट. तथापि श्री. विंझे यांनीं या कामांत चांगलें यश संपादिलें आहे. याबद्दल त्यांचें मी मनापासून अभिनंदन करतों.

त्यांनीं मुळांतील केवळ भावार्थच नव्हे तर विशिष्ट शब्दयोजना शक्यतों कायम राखण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहे. वानगीदाखल कांहीं उदाहरणें दाखवितों—

**जगन्नाथ पंडित—**

**स्फुरत्कामक्रोधप्रबलतरसंजातजटिल-**
**ज्वरज्वालाजालज्वलितवपुषां नः प्रतिदिनम् ।**
**हरन्तां सन्तापं तमपि मरुदुल्लासलहरि-**
**च्छटाचञ्चत्पाथःकणसरणयो दिव्यसरितः ॥ २६ ॥**

**ल. गो. विंझे—**

मनीं कामक्रोधज्वर भडकुनी ज्या उसळती
प्रचंड ज्वाळा त्या सतत तनुचा दाह करिती ।
तुषारश्रेणी त्वज्जलिं पवन जी दे उधळुनी
हरो ती संतापा सकल अमुच्या, हे सुरधुनी ॥ २६ ॥

**जगन्नाथ पंडित—**

**श्वपाकानां व्रातैरमितविचिकित्साविचलितै-**
**र्विमुक्तानामेकं किल सदनमेनःपरिषदाम् ।**
**अहो मामुद्धर्तुं जननि घटयन्त्याः परिकरं**
**तव श्लाघां कर्तुं कथमिव समर्थो नरपशुः ? ॥ २९ ॥**

ल. गो. विंझे—

बहू चर्चेअंतीं चलितमन नीचें त्यजियलीं
अशीं भारी पापें घर करिति माझ्यांत सगळीं ।
अशाही ताराया असिसि कटिबद्धा ! तव, अहा !
यथार्थत्वें कैसा स्तुति करुं शके क्षुद्र नर हा ? ॥ २९ ॥

श्री. विंझे यांचें अनुवादकौशल्य सर्वत्र चांगलेंच दिसून येतें. वरील दोन्ही कवितांत मूळ संस्कृतांतील स्वारस्य, सौंदर्य व नादमाधुर्य जसेंच्या तसें प्रकट झालें आहे. श्री. विंझे संस्कृत व मराठी या दोन्ही भाषांचें मर्म जाणतात.

अशीं भारी पापें घर करिति माझ्यांत सगळीं ।

या चरणांत 'घर करणें' हा अस्सल मराठी वाक्प्रचार कसा चपखल बसला आहे. मूळ काव्याच्या अंतरंगांत शिरून त्याचें रहस्य त्यांनीं मराठीला साजेल अशा शब्दांत आणलें आहे. पंडितांच्या अनुवादांत 'न मर्यादा पापां अघसदन मी एकचि म्हणा' यांत ती मौज नाहीं. योग्य ठिकाणीं योग्य शब्द निवडणें यालाच शैली म्हणतात. वृत्तदृष्ट्या विंझ्यांची कलाकृति निर्दोष आहे. तींत ऱ्हस्वदीर्घांची ओढाताण नाहीं.

श्री. विंझे यांना कांहीं वर्षांपूर्वी हृदय-विकाराचा आजार झाला. त्यांत विरंगुळा म्हणून त्यांना कवितांचा छंद लागला. आतां हा छंद बळावला आहे आणि हृदयविकार मागें हटला आहे. कारण, त्यांच्या काव्यांत सहृदयता प्रगट झाली आहे, किंबहुना, त्यांनीं आपलें हृदयच आपल्या काव्यांत ओतलें आहे म्हणा. हृदयविकारावर अत्युत्तम औषध त्यांना सांपडलें ! त्यांच्या व्यवसायाचा संबंध रसायनशास्त्राशीं होता. आतां ते काव्यरसायनांत रमून गेले आहेत. त्यांच्या काव्याचा एकच गुण सांगा, असें मला कोणीं विचारलें तर मी म्हणेन : 'प्रसाद !' 'प्रसाद' मासिकानेंच

त्यांना प्रकाशांत आणलें, हा 'योगायोग' गंमतीचा आहे. गंगाजलाप्रमाणें त्यांचें काव्य प्रसन्न आहे. हौस ही एक दुर्दम्य चीज आहे! विंझ्यांच्या हातून महाराष्ट्र-सारस्वताची हौसेनें, निष्ठेनें व निरपेक्षतेनें सेवा घडत आहे. मी त्यांना म्हणेन : विंझे, तुमचा हृद्रोग हा शाप नसून वरच होता!

प्रस्तावनेच्या निमित्तानें मला काव्यानंद मनसोक्त लुटतां आला, हा मी मोठा लाभ समजतों. तसेंच श्री. विंझे यांनीं आपलें काव्य गुरुवर्य कै. म. पां. ओक यांस अर्पण केलें आहे हें पाहून मला निरतिशय आनंद झाला. कारण मीहि गुरुवर्य ओकांचाच विद्यार्थी. विंझे माझे गुरुबंधु. आपले हे गुरुबंधु काव्यप्रांतांत मुरलेले पाहून मला परम संतोष होत आहे. आमच्या गुरुवर्यांनाहि, आपला शिष्य आपल्या आवडीचें थोडेंबहुत तरी कार्य करीत आहे, याबद्दल संतोष झाल्याशिवाय कसा राहील?

— **नीलकंठ शंकर नवरे.**

# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना—

माझ्या गंगालहरीच्या समवृत्त समश्लोकी भाषांतराची पहिली आवृत्ति संपून, सहा वर्षांनंतर, दुसरी आवृत्ति काढण्याचा योग येत आहे, याबद्दल आनंद वाटतो. या माझ्या भाषांतराचें सर्व मराठी वाचकांकडून अत्यंत प्रेमानें व उत्साहानें स्वागत झालें, व ज्याच्या ज्याच्या हातीं तें पुस्तक पडलें, तो तो त्यावर अत्यंत प्रसन्न झाला. विसंवादी सूर कोठूनहि ऐकूं आला नाहीं. पुण्याच्या डेक्कन व्हर्नाक्युलर ट्रॅन्स्लेशन सोसायटीकडून, पुस्तकाला, पारितोषिक मिळालें. पूर्वी, पेशवे, श्रावणमासांत, विद्वानांना दक्षिणा-पुरस्कार देत, त्या निधीचीच ही संस्था वारस असल्यानें, खुद्द पेशव्यांचाच पुरस्कार मिळाल्या-सारखाच, हा बहुमान वाटतो.

विद्वान् चिकित्सकांकडून, व, प्रस्तावनालेखक श्री. नी. शं. नवरे यांचेकडून पहिल्या आवृत्तींत, मुख्यत्वें द्विविध दोष दर्शविले गेले. एक—त्या आवृत्तींत घेतलेले वामनी श्लोक, शक्य तों शुद्ध करून घ्यावयास हवे होते; व दुसरा—खुद्द माझ्या भाषांतरांतील, कांहीं, सहज दिसणारे दोष काढून टाकावयास हवे होते. याशिवाय मूळ संस्कृतमधील अनेक पाठ पाहून त्यांतल्या त्यांत निवडून पाठ घ्यायला हवे होते, हा तिसराहि एक दोष दाखविण्यांत आला होता. गंगालहरीविषयीं पुष्कळ अभ्यासपूर्वक चर्चा करणारा, बरेच वर्षांपूर्वी, केसरींत, श्री. य. ग. फफे यांनीं एक चिकित्सक लेख लिहिल्याचा उल्लेख श्री. नवरे यांनीं आपल्या प्रस्तावनेंत केला. त्या लेखाचा शोध घेऊन, श्री. फफे यांना भेटण्याचा, मी विचार करीत होतों; तों एक चमत्कार घडला! श्री. फफे हे नवऱ्यांचे स्नेही! माझी गंगालहरी त्यांनीं नवरे यांजकडून मागून नेली; व तिचा कसून अभ्यास करून (त्यांचा माझा पूर्वपरिचय नसतां) त्यांच्याकडून मला चांगलें चारपांच पानांचें, (वामनाचे कोणते शब्द

सुधारावयाचे तें, व माझ्या भाषांतरांत कोणत्या उणीवा आहेत, तें, सर्व दर्शविणारें ) सविस्तर पत्र आलें. इतकें प्रांजल दोषदर्शन करूनहि, अखेर त्यांनीं मला काय शाबासकी दिली, ती, या पुस्तकाच्या शेवटीं, त्यांच्या पत्राच्या शेवटच्या वाक्यांतल्या अभिप्रायावरून दिसून येईल. आज विद्यमान असलेल्या मराठी भाषाभिज्ञांच्या, सर्वोच्च ज्येष्ठ श्रेणींतले, श्री. फफे हे एक आहेत. म्हणून त्यांची शाबासकी हा मी मोठाच बहुमान समजतों. या प्रकारें या गंगालहरीनें अनाहूतपणें, एका पितृतुल्य, ज्येष्ठ, सल्लागाराची मला प्राप्ति करून दिली, व नंतर, पुढें, त्यांचा व माझा परिचय इतका दृढ झाला, कीं, पुण्याच्या मुक्कामांत अनेक वेळां साहित्यचर्चेसाठीं आश्रयस्थानासारखें, त्यांचें घर, मला होत आलें. त्यांच्याशीं खूप चर्चा करून गंगालहरीचीच नव्हे तर स्वज्ञानाचीहि आत्मशुद्धि मीं करून घेतली; व मी सध्यां छापत असलेल्या संस्कृत-मराठी-सुभाषित कोशांपैकीं अनेक श्लोकांच्या माझ्या भाषांतरांची, अशीच कसून परीक्षा करून घेण्यामुळें हा परिचय मला अत्यंत उपकारक झाला.

श्री. फफे यांच्याशिवाय अनेक रसिक संस्कृतज्ञ मित्रांकडून मिळालेल्या गंगालहरीच्या अनेक निरनिराळ्या आवृत्त्या पाहण्यास मिळाल्या. मुंबईतलेच श्री. वि. प. जोशी हे एक चांगले मार्मिक संस्कृतज्ञ व शुद्धलेखन व शुद्ध छपाई याबाबत अत्यंत चोखंदळ गृहस्थ आहेत. त्यांनीं गंगालहरीच्या ४–५ आवृत्त्या मला दिल्या. त्या त्या पुस्तकांत त्यांनीं केलेल्या, टिपण्या, खुणा, दुरुस्त्या, नवपाठ-सूचना इत्यादींचा फार उपयोग मला झाला. माझ्या आवृत्तींतल्या कांहीं चुकाहि त्यांनीं दाखविल्या. याबद्दल त्यांचा मी विशेष आभारी आहें.

याप्रमाणें, या मध्यंतरींच्या काळांत, मूळ संस्कृत चांगले पाठ घेणें, वामन पंडितांच्या मराठी श्लोकांतील चुका दुरुस्त करणें, व नव्या संस्कृत पाठाला अनुसरून माझ्या भाषांतरांत नवीन श्लोकपंक्ति घालणें, व, जुन्या चुका सुधारण्यासाठीं कांहीं नवी रचना करणें, यांबाबत, मी किती कसून

प्रयत्न केला आहे, तें पुस्तकाच्या शेवटीं जोडलेल्या स्पष्टीकरणाच्या परिशिष्टावरून, दिसून येईल. मूळ पहिल्या आवृत्तींत काय होतें; नवीन पाठ काय घेतला, तो कां घेतला; तसेंच, नुसत्या चुका दुरुस्तीसाठींच नव्हे, तर, अर्थ अधिक सुबोध, अधिक सुबक, मूळार्थाच्या अधिक सदृश, आणण्यासाठींहि, माझ्या स्वतःच्या श्लोकांचीहि रचना, किती, व कां बदलली, हें समजावून देण्यांत, सामान्य वाचकांची दृष्टि अधिक चोखंदळ व चिकित्सक व्हावी, हा हेतु आहे. माझ्या स्वतःच्या मीं स्वतःच काढलेल्या चुका ( ज्या या आवृत्तींत बहुतेक दुरुस्त केल्या आहेत ) पाहिल्या, म्हणजे, एवढ्या विद्वानांनीं व रसिकांनीं या वाचल्या तरी ( एक कै. डॉ. श्रीखंडे वगळून ) कोणीच कशा त्या मला दाखविल्या नाहींत, याचें आश्चर्य वाटतें. इतक्या खोलांत शिरून पाहणारा, समजणारा व दाखवणारा, वाचक विरळ होत चालला आहे, याचें वाईट वाटतें. भाषांतर हें, कधींच, संपूर्ण मूलार्थाइतकें तंतोतंत, होत नाहीं. तेव्हां, अजूनहि राहिलेल्या चुका किंवा, होण्याजोग्या सुधारणा, कोणीहि मला सुचविल्यास, त्यांचा मी साभार स्वीकार करून, पुढच्या आवृत्तीचा योग आल्यास, माझी कृति, अधिक निर्दोष करण्याचा यत्न करीन, असें आश्वासन देतों.

या दोन्ही आवृत्त्यांत, जशी, वामनपंडितांची समश्लोकी दिली, तशीच रघुनाथपंडितांनींहि समवृत्त समश्लोकी केलेली असून, त्याचें हस्तलिखित श्री. फफे यांच्या घरीं, मीं वाचलें; व, या आवृत्तीपासून वामनाच्या बरोबरीनें तीहि द्यावी असा मनोदय होता. परंतु पानशेतच्या महापुरांत श्री. फफे यांच्या घराबरोबर तें हस्तलिखितहि वाहून गेलें. म्हणून या आवृत्तींत ती घालतां आली नाहीं. ( त्याची नक्कल खुद्द फफे यांनीं एका गृहस्थास करून दिली होती. ती मिळविण्याचा प्रयत्न करणार आहें. ) प्रथमावृत्तीच्या प्रस्तावनेंत, श्री. नवरे यांनीं, पाठांविषयीं व माझ्या चुकांविषयीं, जो मजकूर

लिहिला होता, तो ( आतां त्या सर्व दुरुस्त्या या आवृत्तींत केल्या गेल्या असल्यानें ) गाळला आहे.

प्रथमावृत्तीप्रमाणेंच या अधिक चिकित्सक आवृत्तीचें रसिकांकडून प्रेमानें स्वागत होईल अशी अपेक्षा आहे. वाचकांनीं कोणताहि श्लोक वाचण्यापूर्वी, स्पष्टीकरणाचें परिशिष्ट वाचावें, म्हणजे, प्रथमावृत्तीपेक्षां हींत काय सुधारणा आहेत तें समजेल.

८२ खटाव बिल्डिंग, लालबाग
मुंबई १२ D. D.
२२-२-६३ ( महाशिवरात्र )

ल. गो. विंझे

# अर्पण-पत्रिका

( शिखरिणी )

जगन्नाथाची ही श्रवणमधुरा कोमलपदा
कृती, पश्चात्तप्तां सततचि असे पुण्यगतिदा।
जगीं वाहे गंगा यदवधि सुधाश्वेतसलिला
न भीती नाशाची तदवधिहि या काव्यकृतिला ॥ १ ॥

जगीं झाल्या, गेल्या; प्रचलितहि भाषा किति तरी
तयां सर्वांहूनी मधुरतर गीर्वाणचि खरी।
जगन्नाथाची त्यांतुनि ललित गंगालहरि ही !
रुची मूळाची ये रुचिर, अनुवादीं न कधिंही ॥ २ ॥

सम-श्लोकीं-वृत्तीं हिजसि अनुवादांत नटवी
मराठीमध्येंच प्रथितयश तो वामन कवि।
कवी तो कोठें ! मी इतरजन कोठें ! मज करी–
क्षमा या धाष्टर्याची रसिकजन, ही निश्चिति, परी ॥ ३ ॥

असे या कार्याची कठिनतम जाणीव मज ती
" मल्लीलालोलल्लहरि " मनिं उत्तुंग उठती।
" सुधाधाराकारें " वरुनि जधिं हें काव्य उतरे
तदास्वादेच्छा कां तृषित हृदया योग्य न ठरे ? ॥ ४ ॥

स्वयें चाखोनीयां सुख, जरि महानंद घडतो
दुज्यांना तें देण्यांतचि अधिक त्याहून वसतो ।
स्वयें ज्या काव्याचा रस पिउनि मी तृप्त बनलों
जगाला तो देण्या प्रमुदितमनें आज सजलों ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शा. क्र. 13490
शाखा (स्थळ प्रत)

* *



कै. गुरुवर्य महादेव पांडुरंग ओक.—
माजी संस्कृत शिक्षक, न्यू इंग्लिश स्कूल, पुणें.
जन्म ९-१०-१८७४ मृत्यु २३-३-१९३०

* *

गुरूमध्यें झाले गुरुतम म. पां. ओकगुरुजी !
दिली त्यांनीं मातें अनुपम अशी काव्यरुचि जी ।
तिला आलेलें हें प्रथमफल त्यांच्या शुभपदीं
समर्पोनी वाटे मजसि अनृणी धन्य जगतीं ॥ ६ ॥

— o —

# श्रीगंगालहरी

( ४८ व्या श्लोकापर्यंत सर्व श्लोकांचें वृत्त– शिखरिणी. )

जगन्नाथ पंडित —

समृद्धं सौभाग्यं सकलवसुधायाः किमपि तन्-
महैश्वर्यं लीलाजनितजगतः खण्डपरशोः ।
श्रुतीनां सर्वस्वं सुकृतमथ मूर्तं सुमनसां
सुधासोदर्यं ते सलिलमशिवं नः शमयतु ॥ १ ॥

वामन पंडित —

अशेषा भूमीचें विपुलतर सौभाग्य मिरवी
जगातें लीलेनें करि, शिव, तया भूतिपद वी ।
श्रुतींची तत्त्वोक्ती, सुकृत विबुधांचेंचि अथवा
सुधाबंधू तूझें सलिल अमुच्या नाशु अशिवा ॥ १ ॥

ल. गो. विंझे —

उभ्या या पृथ्वीचें जणु विपुल सौभाग्य विलसे
रची जो लीलेनें, जग, शिव, तया वैभव असे ।
श्रुतींचें जें सार, प्रकट विबुधांचें सुकृत जें
हरो अस्मत्पापें, मधु जल, सुधाबांधव तुझें ॥ १ ॥

अर्थ : हे गंगानदि ! जें हें तुझें जल साऱ्या पृथ्वीचें जणू महासौभाग्यच आहे; लीलेनें जगाची निर्मिति करणाऱ्या शंकराला, जें मोठ्या वैभवाप्रमाणें आहे ; वेदांचें जें सारच; जें देवांच्या पुण्याचें साकार स्वरूपच आहे; आणि अमृताचें बंधु असें तुझें जल, आमचें पाप नष्ट करो.

— ० —

जगन्नाथ पंडित —

दरिद्राणां दैन्यं दुरितमथ दुर्वासनहृदां
द्रुतं दूरीकुर्वन् सकृदपि गतो दृष्टिसरणिम्।
अपि द्रागाविद्यद्रुमदलनदीक्षागुरुरिह
प्रवाहस्ते वारां श्रियमयमपारां दिशतु नः॥ २॥

वामन पंडित —

दरिद्रांच्या दैन्या, मलिनहृदयांच्या अघबला
हरी एक्या वारीं, त्वरित, पडतां नेत्रकमलां।
अविद्यावृक्षाचें हनन करि दीक्षागुरुच हा
तुझा देवू तोयप्रवह अमुतें भूतिनिवहा ॥ २ ॥

ल. गो. विंझे —

दरिद्रांचें दैन्य, द्रुत दुरित दुष्टांतिल हरी
घडे ज्यांच्या नेत्रां सकृदपि तुझें दर्शन जरी।
अविद्यावृक्षाचें दलन शिकवी जो गुरुपरी
जलौघ, श्री आम्हां अमित वितरो तो महिवरी ॥ २ ॥

अर्थ : ज्या तुझ्या प्रवाहाचें एकदांहि दर्शन घडलें असतां, जो दरिद्रांचें दैन्य व दुर्वृत्तांचें पाप त्वरित हरण करतो; तसेंच जो गुरू-प्रमाणें अविद्यावृक्षाचें उच्छेदन करण्यास शिकवितो, तो तुझा जलप्रवाह आम्हांस अपार अभ्युदयश्री प्राप्त करून देवो.

जगन्नाथ पंडित —

दरिद्राणां दैन्यं दुरितमथ दुर्वासनहृदां
द्रुतं दूरीकुर्वन् सकृदपि गतो दृष्टिसरणिम्।
अपि द्रागाविद्यद्रुमदलनदीक्षागुरुरिह
प्रवाहस्ते वारां श्रियमयमपारां दिशतु नः॥ २॥

वामन पंडित —

दरिद्रांच्या दैन्या, मलिनहृदयांच्या अघबला
हरी एक्या वारीं, त्वरित, पडतां नेत्रकमलां।
अविद्यावृक्षाचें हनन करि दीक्षागुरुच हा
तुझा देवू तोयप्रवह असुतें भूतिनिवहा ॥ २ ॥

ल. गो. विंझे —

दरिद्रांचें दैन्य, द्रुत दुरित दुष्टांतिल हरी
घडे ज्यांच्या नेत्रां सकृदपि तुझें दर्शन जरी।
अविद्यावृक्षाचें दलन शिकवी जो गुरुपरी
जलौघ, श्री आम्हां अमित वितरो तो महिवरी ॥ २ ॥

अर्थ : ज्या तुझ्या प्रवाहाचें एकदांहि दर्शन घडलें असतां, जो दरिद्रांचें दैन्य व दुर्वृत्तांचें पाप त्वरित हरण करतो; तसेंच जो गुरूप्रमाणें अविद्यावृक्षाचें उच्छेदन करण्यास शिकवितो, तो तुझा जलप्रवाह आम्हांस अपार अभ्युदयश्री प्राप्त करून देवो.

जगन्नाथ पंडित—

उदञ्चन्मात्सर्यस्फुरदधरहेरम्बजननी-
कटाक्षव्याक्षेपक्षणजनितसंक्षोभनिवहाः।
भवन्तु त्वङ्गन्तो हरशिरसि गङ्गातनुभुव-
स्तरङ्गाः प्रोत्तुङ्गा दुरितभयभङ्गाय भवताम् ॥ ३ ॥

वामन पंडित—

उदेल्या मात्सर्यें, गजवदनमाता, स्वकपटें-
कटाक्षानें पाहे तरि मनिं महाक्रोध झगटे।
अशा आविर्भावें, पृथुल लहरी तूज उठती-
शिरीं शंभूच्या, त्या जनकलुष भंगूत निगुतीं ॥ ३ ॥

ल. गो. विंझे—

सती कांपे ओष्ठीं, जधिं हृदिं असूया उसळते
कटाक्षें तेव्हांच्या खळबळ क्षणीं ज्यांत उठते।
अशा गंगेच्या ज्या शिवशिरिं समुत्तुंग लहरी
झडो त्यांच्या योगें, दुरित तुमचेंही झडकरीं ॥ ३ ॥

अर्थ : सवतीमत्सरानें, ओठ थरथर कांपत, ( तीव्र ) कटाक्षानें पार्वती जेव्हां ( गंगेकडे ) पाहते, तेव्हां तत्क्षणींच ज्यांच्यांत भयंकर खळबळ उडून जाते अशा, शंकराच्या शिरावरील गंगाप्रवाहाच्या उंच उंच लाटा तुमचें पापभय नष्ट करण्यास कारणीभूत होवोत.

जगन्नाथ पंडित—

तवालम्बादम्ब ! स्फुरदलघुगर्वेण सहसा
मया सर्वेऽवज्ञासरणिमथ नीताः सुरगणाः ।
इदानीमौदास्यं भजसि यदि भागीरथि ! तदा
निराधारः केषामिह कथय हा ! रोदिमि पुरः ॥४॥

वामन पंडित—

बळें आलंबाच्या तव, जननि ! गर्वोद्धतमनें
अवज्ञेचे पंथीं सकल सुर मी पाववि दिने ।
अतां गंगे ! माझेविषयीं जरि चित्तीं उबगसी
रडूं तेव्हां कोणाजवळ ? मज सांगें गति कशी ? ॥ ४ ॥

ल. गो. विंझे—

तुझ्या आधारानें बनुनि अतिगर्वोद्धत झणीं
अवज्ञा देवांची सकल, बसलों मीच करुनी ।
उदासीना आतां जर मजसि गे ! तूंच बनसी
रडूं कोणापाशीं ? वद, न कुणि आधार मजसी ॥ ४॥

अर्थ : हे भागीरथि ! माते ! तुझ्या आधारामुळें अत्यंत गर्विष्ठ व उद्धट होऊन, सर्व देवांना तुच्छ समजून, मी त्यांचा अपमान करून बसलों; आणि आतां जर तूंच माझ्याशीं उदासीन होणार असशील, तर, सर्व बाजूंनीं निराधार झालेला मी, हाय ! हाय ! या जगीं, कोणापाशीं रडूं ? सांग !

जगन्नाथ पंडित—

स्मृतिं याता पुंसामकृतसुकृतानामपि च या
हरत्यन्तस्तन्द्रां तिमिरमिव चन्द्रांशुसरणिः।
इयं सा ते मूर्तिः सकलसुरसंसेव्यसलिला
ममान्तःसंतापं त्रिविधमथ पापं च हरतु ॥ ५ ॥

वामन पंडित—

न केलें सत्कर्माचरण, जरि त्यांनींहि स्मरतां
तयांच्या जाड्यातें हरिसि, तिमिरा जेविं सविता।
अशी तूझी ते हे तनु सुरगणां सेव्य सकलां
त्रिधा माझ्या पापा, अणिक हरु संताप सगळा ॥ ५ ॥

ल. गो. विंझे—

जशी ज्योत्स्ना नाशी तिमिर, तव मात्र स्मरणची
हरी तंद्रा, केलें सुकृत न, अशांच्याहि मनिंची।
अशी ही त्वन्मूर्ती ! सकल अमरां यज्जल रुचे
हरो सारीं पापें त्रिविध, मम, संताप हृदिंचे ॥ ५ ॥

अर्थ : चांदणें ज्याप्रमाणें अंधाराचा नाश करतें, तद्वत्, जिचें नुसतें स्मरण, हें, ज्यांनीं पुण्य केलें नाहीं, अशांच्याहि मनाच्या आलस्याचा नाश करितें, जिचें जल सकल देव आवडीनें पितात, अशी ही तुझी (प्रवाह) मूर्ति माझीं संपूर्ण त्रिविध पापें व हृदयांतील दाह नष्ट करो.

जगन्नाथ पंडित—

अपि प्राज्यं राज्यं तृणमिव परित्यज्य सहसा
विलोलद्वानीरं तव जननि ! तीरं श्रितवताम् ।
सुधातः स्वादीयः सलिलभरमातृप्ति पिबतां
नृपाणामानन्दः परिहसति निर्वाणपदवीम् ॥ ६ ॥

वामन पंडित—

त्यजोनी साम्राज्या तृणसदृश जे कां शुभमति
तुझ्या तीरीं वेत्रावलिललित नीरांत वसती ।
सुधेहूनी स्वादू सलिल पिउनी तृप्त जन जे
तयांच्या आनंदें गुणरहित मोक्षास हंसिजे ॥ ६ ॥

ल. गो. विंझे—

महासाम्राज्याही तृणसम झणीं जे त्यजुनियां
जिथें वेत्रांच्या या तति डुलति, तीरीं वसुनियां ।
जळा आतृप्ती जैं मधुर अमृताहूनहि पिती
तदानंदें, मोक्षा नृप गणुनि ते तुच्छ, हंसती ॥ ६ ॥

अर्थ : हे माते ! जे राजे, स्वतःचीं महासाम्राज्यें, तृणवत् समजून, त्यांना सोडून, जिथें वेतसतरूंच्या तति डुलत आहेत, अशा तुझ्या तीरावर आश्रयास येतात, ते, अमृताहून गोड तुझें पाणी (पोटभर) पिऊन जेव्हां तृप्त होतात, तेव्हांचा त्यांचा आनंद प्रत्यक्ष मोक्षालाहि तुच्छ गणतो.

जगन्नाथ पंडित—

प्रभाते स्नातीनां नृपतिरमणीनां कुचतटी-
गतो यावन्मातर्मिलति तव तोयैर्मृगमदः।
मृगास्तावद्वैमानिकशतसहस्रैः परिवृता
विशन्ति स्वच्छन्दं विमलवपुषो नन्दनवनम् ॥ ७ ॥

वामन पंडित—

नृपस्त्रीवक्षोजीं मृगमद विलेपार्थ असतां
प्रभातस्नानें तो जननि ! तव तोयांत मिळतां ।
क्षणें देवश्रेणींसह मृग तया नंदनवनीं
स्वइच्छेनें जाती अति विमल देहास धरुनी ॥ ७ ॥

ल. गो. विंझे—

प्रभातीं न्हातांना, नृपरमणिवक्षःस्थ, गळुनी
तुझ्या पाण्यामध्यें मृगमद न जों जाय मिळुनी ।
क्षणीं त्या, तत्पापें झडुनि, मृग ते शुद्ध बनुनी
सुखें देवांसंगें सहज शिरती नन्दनवनीं ॥ ७ ॥

अर्थ : आई ! ( तुझ्या पाण्याचा पापनाशक गुण एवढा थोर आणि त्वरित फलदायी आहे, कीं, ) राजस्त्रिया सकाळीं तुझ्या पाण्यांत स्नान करतांना, त्यांच्या वक्षोजांवर लावलेली कस्तूरि, ज्या क्षणीं तुझ्या पाण्यांत मिसळते, त्याच क्षणीं ( ज्यांच्या नाभीपासून ती कस्तूरि निघाली ते ) मृग शुद्ध होऊन लाखों देवांदिकांसंगें मोठ्या आनंदानें नंदनवनामध्यें प्रवेश करतात.

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

स्मृतं सद्यः स्वान्तं विरचयति शान्तं सकृदपि
प्रगीतं यत्पापं झटिति भवतापं च हरति ।
इदं तद्गङ्गेति श्रवणरमणीयं खलु पदं
मम प्राणप्रान्ते वदनकमलान्तर्विलसतु ॥ ८ ॥

वामन पंडित--

मना आणी शांति स्मरण करितां जें क्षणभरीं
गितीं गातां पापा त्वरित भवतापाप्रति हरी ।
अहो तें हें कर्णां मधुरतर गंगापद असें
असो प्राणत्यागीं मुखकमळिं माझ्या समरसें ॥ ८ ॥

ल. गो. विंझे—

स्मृतीनेंही एका, झणिं निजमना शांति वितरी
जया गातां, पापा, त्वरित भवतापासहि हरी ।
असें " गंगा! गंगा! " श्रुतिमधुर हें नाम तव गे!
मुखीं राहो माझ्या मरणसमयीं, हे त्रिपथगे! ॥ ८ ॥

अर्थ : ज्याचें एकदांहि स्मरण होतांच जें आपल्या हृदयाला शांति देतें; आणि, ज्याचें गायन केलें असतां, पाप आणि भवताप यांचा त्वरित नाश करतें, असें तें अत्यंत श्रुतिमधुर "गंगा! गंगा!" हें नांव माझ्या मरणसमयीं माझ्या मुखीं राहो!

—— o ——

जगन्नाथ पंडित—

यदन्तः खेलन्तो बहुलतरसंतोषभरिता
न काका नाकाधीश्वरनगरसाकाङ्क्षमनसः ।
निवासाल्लोकानां जनिमरणशोकापहरणं
तदेतत्ते तीरं श्रमशमनधीरं भवतु नः ॥ ९ ॥

वामन पंडित—

जलामध्यें क्रीडा करुनि बहु तोषेंचि असती
तया काकांचेही सुरपतिपुरीं काम नसती ।
निवासें लोकांचें हरि जनिमृती-दुःख मनिचें
असें तूझें तीर श्रम परिहरू सर्व अमुचे ॥ ९ ॥

ल. गो. विंझे—

जिथें काकां क्रीडा करुनि इतुकी तृप्ति मिळते
न इच्छा इंद्राचें नगर बघण्याचीहि उरते ।
स्वतांच्या अस्तित्वें जनिमरणदुःखा हरितसें
तुझें तें हें तीर श्रमशमनिं होवो क्षम तसें ॥ ९ ॥

**अर्थ** : ज्या तुझ्या ( दोन ) तीरांमधल्या ( पाण्यांत ) खेळ करून ( तीरावरील यःकश्चित् ) कावळ्यांना ( सुद्धां ) इतकी तृप्ति मिळते, कीं, त्यांना इंद्राची नगरी पाहण्याचीसुद्धां इच्छा उरत नाहीं, व, स्वतांच्या अस्तित्वानें, जें, जनांचें जन्ममरणदुःख हरण करतें, तें तुझें हें तीर, आमचाहि श्रमपरिहार करण्यास समर्थ होवो.

जगन्नाथ पंडित—

न यत्साक्षाद्वेदैरपि गलितभेदैरवसितं
न यस्मिञ्जीवानां प्रसरति मनोवागवसरः ।
निराकारं नित्यं निजमहिमनिर्वासिततमो
विशुद्धं यत्तत्त्वं सुरतटिनि ! तत्त्वं; न विषयः ॥ १० ॥

वामन पंडित—

दिसेना जें वेदां गतनिखिलभेदांसि नयनीं
न जेथें जीवांची प्रसरति मनोवाक्यसरणी ।
अकारा नाशातें त्यजुनि निजरूपींच वसणें
जया तत्त्वा तें तूं; विषय म्हणती मूढ मतिनें ॥ १० ॥

ल. गो. विंझे—

दुरी भेदां सारोनिहि कधिं न वेदांहि गवसे
मनाची वाणीची गतिहि जिथ पंगू ठरतसे ।
तमा नाशी तेजें, चिर, विमल, आकार न, असें
स्वयें तें तूं तत्त्व प्रकट असती, संशय नसे ॥ १० ॥

अर्थ : हे स्वर्गंगे ! आपल्या-आपल्यांतले मतभेद दूर सारूनहि, प्रत्यक्ष वेदांना जें सांपडलें नाहीं; ज्याच्यापुढें मानवाच्या मनाची व वाणीची गति खुंटून जाते; निराकार, नित्य, स्वतेजानें अंधार नष्ट करणारें, व, विशुद्ध, असें जें तत्त्व, तें तूं आहेस हें निःसंशय !

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

महादानैर्ध्यानैर्बहुविधवितानैरपि च यन्
न लभ्यं यद् घोरैः सुविमलतपोराशिभिरपि ।
अचिन्त्यं तद्विष्णोः पदमखिलसाधारणतया
ददाना केनासि त्वमिह तुलनीया कथय नः ॥ ११ ॥

वामन पंडित—

महादानें ध्यानें व्रत नियम यज्ञादिक विधि
इहीं जें लाभेना विमल तपकर्त्यांसहि कधीं ।
असें तें विष्णूचें पद सहज तूं देशि ललिते !
समत्वीं, त्या तूंतें कवण तुलिजे सांग अमुतें ॥ ११ ॥

ल. गो. विंझे—

महादानें, ध्यानें, बहुविधहि यज्ञां करुनियां
तपश्चर्या मोठी करुनिहि मिळे जें न कधिं; त्या— ।
अभेदत्वें नेशी हरिपदिं अचिंत्या, सकळिकां
तुझ्या तोलाची गे ! वद जगिं असे अन्य कुणि कां ? ॥ ११ ॥

अर्थ : मोठमोठीं दानें, ध्यानधारणा, अनेक प्रकारचे यज्ञ करून, किंवा, ढीगभर मोठीं घोर व विशुद्ध तपें करूनसुद्धां, ज्याचा लाभ होऊं शकत नाही, अशा अचिंत्य विष्णुपदाची प्राप्ति, सर्वांना समभावें तूं करून देतेस, तेव्हां तुझ्याशीं तुलनीय असें दुसरें कोण या जगीं आहे ? सांग !

जगन्नाथ पंडित—

नृणामीक्षामात्रादपि परिहरन्त्या भवभयं
शिवायास्ते मूर्तेः क इह महिमानं निगदतु ?।
अमर्षम्लानायाः परममनुरोधं गिरिभुवो
विहाय श्रीकण्ठः शिरसि नियतं धारयति याम् ॥ १२ ॥

वामन पंडित—

विलोकीतां जीतें, भवभय जनांचें परिहरी
तया त्वन्मूर्तीचा अतुल महिमा कोण विवरी ?।
अतिक्रोधें खिन्नें करि हट उमा, तो न गणुनी
प्रयत्नें श्रीशंभू तुज निजशिरीं ठेवि जननि ! ॥ १२ ॥

ल. गो. विंझे—

पहाण्यानेंही जी भवभय हरी, त्या तव महा—
यशातें उद्गाया क्षम कुणि असे कां मनुज हा ? ।
उमा क्रोधाविष्टा, अनुनय तिचा टाकुनि परी
जगन्माते ! तूंतें शिव निजशिरीं संतत धरी ॥ १२ ॥

अर्थ : नुसत्या दर्शनानें, किंवा कटाक्ष टाकूनसुद्धां, जी भवभयहरण करते, त्या तुझ्या कल्याणकारक मूर्तीचा महिमा कोण वर्णन करूं शकेल ? प्रत्यक्ष स्वपत्नी पार्वती, सापत्न्यभावानें भडकली, तरी, तिची मनधरणी करण्याचें सोडून, साक्षात्, श्रीशंकर, तुला नेहमीं आपल्या शिरावर धारण करितो !

—— ० ——

जगन्नाथ पंडित —

विनिंद्यान्युन्मत्तैरपि च परिहार्याणि पतितै-
रवाच्यानि व्रात्यैः सपुलकमपास्यानि पिशुनैः।
हरन्ती लोकानामनवरतमेनांसि कियतां
कदाऽप्यश्रान्ता त्वं जगति पुनरेका विजयसे॥ १३॥

वामन पंडित —

मदोन्मत्तव्रात्याधमपतितपैशुन्यनिकरीं
इहीं हीं जीं त्रासें त्यजियलिं सकंपें अतिदुरी।
जनांचीं तीं पापें सतत शमवीतां न शिणली
अशी तूंची एक प्रकटविभवें नांदसि भली॥ १३॥

ल. गो. विंझे —

प्रमत्तीं निंदावीं, पतितजन टाळील दुरुनी
न बोलावीं व्रात्यीं, सपुलकचि जीं त्याज्य पिशुनीं।
अशीं सारीं पापें हरिसि कितिकांचीं नित, तरी –
थकोनी ना जाशी! जगीं विजयि तूं एकचि खरी॥ १३॥

अर्थ : उन्मत्तांनाहि जीं निंद्य वाटतात; पतितांनाहि जीं टाळावीशीं वाटतात; भ्रष्टांनाहि जीं तोंडानें बोलवत नाहींत; नीचांनाहि, जीं करावयाच्या कल्पनेनेंहि अंगावर कांटा उभा राहतो, अशीं कित्येकांचीं पापें, अखंडितपणें नष्ट करण्याचे श्रम करीत असूनसुद्धां तूं कधीं थकत नाहींस! जगामध्यें विजयी खरोखर तूं एकच आहेस.

जगन्नाथ पंडित —

स्खलन्ती स्वर्लोकादवनितलशोकापहृतये
जटाजूटग्रन्थौ यदसि विनिबद्धा पुरभिदा ।
अये निर्लोभानामपि मनसि लोभं जनयतां
गुणानामेवायं तव जननि ! दोषः परिणतः ॥ १४ ॥

वामन पंडित —

अलीसी स्वर्लोकाहुनि अवनिच्या शोकहरणीं
अशा तूतें बांधी शिव निजकपर्दी निशिदिनीं ।
अयी निर्लोभाला उपजविति लोभा, गुण असे
तुझे, त्यांचा प्रादुर्भव जननि ! ऐसा फळतसे ॥ १४ ॥

ल. गो. विंझे —

जधीं स्वर्गभ्रष्टा उतरसि जगच्छोकहरणीं
जटांमध्यें बांधी तधिं शिव तुला जें जखडुनी ।
अहो ! निर्लोभांच्या उपजविति जे लोभचि मनीं
गुणांचाची त्या हा तव निपजला दोष जननी ! ॥ १४ ॥

**अर्थ :** हे जननि ! जगतीतलावरील शोक हरण्यासाठीं, तूं जेव्हां स्वतःला स्वर्गभ्रष्ट करून घेतलेंस, तेव्हां शंकरानें, आपल्या जटांच्या गांठींमध्यें तुला घट्ट बांधून ठेविलें. अहाहा ! ( शंकरासारख्या ) निर्लोभ हृदयांतसुद्धां लोभ उत्पन्न होणें, हा तुझ्या गुणांपासूनच दोष उपजावा ( हें केवढें विपरीत ! )

जगन्नाथ पंडित—

जडानन्धान्पङ्गून्प्रकृतिबधिरानुक्तिविकलान्
ग्रहग्रस्तानस्ताखिलदुरितनिस्तारसरणीन् ।
निलिम्पैर्निर्मुक्तानपि च निरयान्तर्निपततो
नरानम्ब ! त्रातुं त्वमिह परमं भेषजमसि ॥ १५ ॥

वामन पंडित—

जडांधां, पंगूतें, बहुबधिर, वाणीविकल, जे
ग्रहक्लेशी, ज्यांचें अघहनन यत्नें न घडिजे ।
सुरींही सोडीले कुनर नरकाचेचि गमनीं
अशांतें रक्षाया पटु, जननि ! तूं औषधि गुणी ॥ १५ ॥

ल. गो. विंझे—

जडां, अंधां, मूकां, विकलतनु त्यां, जन्मबधिरां
ग्रहांची पीडा ज्यां, अघहननिं ज्यां मार्ग नुरला ।
त्यजोनी देवांनीं पडति नरकीं जे कितितरी
अशां ताराया तूं असिसि जगिं दिव्यौषधि खरी ॥ १५ ॥

**अर्थ :** जड, आंधळे, पांगळे, जन्माचे बहिरे, नवग्रहांची पीडा होऊन जे ग्रस्त आहेत, पापांतून मुक्त होण्याचा ज्यांना कसलाच मार्ग उरलेला नाहीं, देवांनीं ( असाध्य म्हणून ) सोडून दिल्यानें जे नरकांत पडतात, अशा सर्वांना ( त्यांच्या त्यांच्या पापरोगांतून ) मुक्त करणारी, हे माते ! तूं दिव्यौषधि आहेस.

जगन्नाथ पंडित—

स्वभावस्वच्छानां सहजशिशिराणामयमपा-
मपारस्ते मातर्जयति महिमा कोऽपि जगति ।
मुदा यं गायन्ति द्युतलमनवद्यद्युतिभृतः
समासाद्याद्यापि स्फुटपुलकसान्द्राः सगरजाः ॥ १६ ॥

वामन पंडित—

स्वभावें जीं स्वच्छें, सहज अतिशीतें तव जळें
तयांच्या उत्कर्षें यश सकळ लोकांत उजळे ।
जयां गाती तोषें, सगरसुत रोमांच धरुनी
गति स्वर्लोकीं त्यां, तव विभवयोगेंचि जननी ! ॥ १६ ॥

ल. गो. विंझे—

निसर्गेंची पाणी तव विमल अन् शीतल तसें
जगीं त्याचा माते ! अतुल महिमा गाजत असे ।
जया मोदें गाती सगरसुत स्वर्गा मिळवुनी
सुतेजस्वी, देहीं, पुलकित बनोनीच अजुनी ॥ १६ ॥

अर्थ : हे माते ! निसर्गतःच स्वच्छ आणि सहजशीतल अशा तुझ्या जलाचा अवर्ण्य असा अपार महिमा जगभर गाजत आहे. ( सहस्रों वर्षांपूर्वी ) सगरपुत्रांना ( या जलामुळें ) स्वर्गाचा लाभ झाला व दिव्य देह प्राप्त झाला. पण, ते, त्या तुझ्या जलाचा महिमा अजूनहि मोठ्या आनंदानें पुलकित होऊन गात असतात.

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

कृतक्षुद्रैनस्कानथ झटिति संतप्तमनसः
समुद्धर्तुं सन्ति त्रिभुवनतले तीर्थनिवहाः ।
अपि प्रायश्चित्तप्रसरणपथातीतचरितान्
नरानूरीकर्तुं त्वमिव जननि ! त्वं विजयसे ॥ १७ ॥

वामन पंडित—

घडे दैवें किंचित् कलुष तरि संतापति मनीं
अशांतें ताराया असति बहु तीर्थें त्रिभुवनीं ।
जयां प्रायश्चित्तें नसति, कुनरां दे गति, अशी—
समर्था या लोकीं तुजसम अशी तूंच असशी ॥ १७ ॥

ल. गो. विंझे—

घडे अल्पें पापें अनुशय मनीं, ज्यां, झणिं, तयां
समुद्धर्तीं तीर्थें कितिक असतीं हो त्रिजगिं या ।
जयां प्रायश्चित्तें किमपिहि करूं ना शकति, त्यां
जनां वक्षीं घेसी ! तुजसम अहा ! तूंचि जगिं या ॥ १७ ॥

अर्थ : एवढेंसें कुठें पाप हातून घडलें, तर, त्याचीसुद्धां ज्यांच्या मनास रुखरुख लागते, अशांचा उद्धार करणारीं तीर्थें, त्रिभुवनांत, शेंकडों-गणति पडलेलीं आहेत. परंतु कसल्याहि प्रायश्चित्तांचा उपाय ज्यांच्यावर चालूं शकत नाहीं, अशीं ज्यांचीं पापें, त्यांना उद्धरून पोटाशीं घेणारी, हे माते ! तुझ्यासारखी तूंच (अनन्य) धन्य आहेस !

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

निधानं धर्माणां किमपि च विधानं नवमुदां
प्रधानं तीर्थानाममलपरिधानं त्रिजगतः।
समाधानं बुद्धेरथ खलु तिरोधानमधियां
श्रियामाधानं नः परिहरतु तापं तव वपुः ॥ १८ ॥

वामन पंडित—

अगार श्रेयाचें सकलजनसंतोष अवनीं
अशेषां तीर्थांची गुरु, रुचिर चीर त्रिभुवनीं।
मतीसी सौख्या दे मलिन मतिला दुर्लभ रुची
असें धाम श्रीचें तव वपु हरो आग असुची ॥ १८॥

ल. गो. विंझे—

खनी तूं धर्मांची, अनुपमनवानंदजननी
प्रमुख्या तीर्थांची, शुभवसन तूं या त्रिभुवनीं।
अबुद्धी झांकोनी, वितरसि समाधान मतिला
अनेकश्रीदात्री तव तनु हरो ताप सगळा ॥ १८ ॥

**अर्थ** : धर्मांचें मूलस्थान, अवर्ण्य नवनवा आनंद देणारी, सर्व तीर्थांची प्रमुख, [ त्रिभुवनांतून वाहणाऱ्या आपल्या शुभ्रप्रवाहरूपी ] वस्त्रानें त्रिभुवनास आच्छादणारी, बुद्धीला समाधान देणारी, अज्ञानावर पांघरुण घालणारी, व अभ्युदयाचें उगमस्थान, अशी तुझी तनु आमचा ताप हरण करो.

जगन्नाथ पंडित—

पुरो धावं धावं द्रविणमदिराघूर्णितदृशां
महीपानां नानातरुणतरखेदस्य नियतम् ।
ममैवायं मन्तुः स्वहितशतहन्तुर्जडधियो
वियोगस्ते मातर्यदिह करुणातः क्षणमपि ॥ १९ ॥

वामन पंडित—

मदें श्रीच्या अंध प्रभु म्हणविती मद्यपि जसे
पुढें त्यांच्या धांवें, श्रमसहित मी लोभविवशें ।
मतीच्या मंदत्वें त्यजुनि तुज नाशीं हितशता
अये हा माझाची अनय, करुणा तूज उचिता ॥ १९ ॥

ल. गो. विंझे—

धनाच्या मद्यानें नयन फिरलेले नरपति;
अशांच्या धांवोनी पुढति, बनलों खिन्नचि अति ।
असे माझा दोष, स्वहितरिपु मूर्ख अजवरी
न केली त्वत्सेवा, म्हणुनि करुणा तूं क्षण करीं ॥ १९ ॥

**अर्थ :** धनाच्या मदिरेनें ( किंवा धनानें आणि मदिरेनें ) ज्यांचे डोळे फिरलेले आहेत, अशा राजांच्या पुढें, नित्य ( द्रव्यप्राप्तीसाठीं ) धांवून, धांवून, मी अतिशय कष्टी होत आलों आहें. ( वास्तविक हें सर्व सोडून मीं तुझा आश्रय घ्यावयास हवा होता; पण ) मूर्खपणें, मी माझाच शेंकडों प्रकारें हितशत्रु झाल्यानें, आजवर तुझ्याकडे आलों नाहीं – तुझा वियोग घडला–हा माझाच दोष आहे ! म्हणून, हे आई ! तूं क्षणभर ( मजवर ) दया कर.

**जगन्नाथ पंडित —**

मरुल्लीलालोलल्लहरिलुलिताम्भोजपटली -
स्खलत्पांसुव्रातच्छुरणविसरत्कौंकुमरुचि ।
सुरस्त्रीवक्षोजक्षरदगरुजम्बालजटिलं
जलं ते जम्बालं मम जननजालं जरयतु ॥ २० ॥

**वामन पंडित —**

स्फुरे वायू, तेणें उठति लहरी, तैं कमळिंचा
गळे रेणू, तेणें सलिल विलसे कुंकुमरुचा ।
जया देवस्त्रींच्या स्तनअगरुचा पंक मिसळे
बहू धांवे ऐसें तव जळ हरू जन्म सगळे ॥ २० ॥

**ल. गो. विंझे —**

सुटे वारा; हाले जल, डुलुनि जो पंकजसरी-
गळे रेणू, भासे जणुं जळिं तरे कुंकुम वरी ।
सुरस्त्रीवक्षींच्या अगरुसह शैवालहिं जिथें
भवाच्या जालातें, जटिल जल तें जीर्ण करुं दे ॥ २० ॥

**अर्थ :** वाऱ्याच्या लीलेनें, पाण्यांत लाटा उठून, त्यामुळें कमलें डुलूं लागून, त्यांतून गळून ( पाण्यावर तरंगणाऱ्या ) रेणूंमुळें ज्या तुझ्या पाण्याला कुंकवाचा रंग आला आहे; ( स्नानामुळें ) देवस्त्रियांच्या वक्षोजांवरील अगरुयुत शैवालानें दाट झालेलें असें तें तुझें जल, माझें जन्मजाल जीर्ण करो.

९३५१०

जगन्नाथ पंडित—

समुत्पत्तिः पद्मारमणपदपद्मामलनखा—
न्निवासः कंदर्पप्रतिभटजटाजूटभवने।
अथायं व्यासङ्गो हतपतितनिस्तारणविधौ
न कस्मादुत्कर्षस्तव जननि जागर्तु जगति ॥ २१ ॥

वामन पंडित—

बरी उत्पत्ति श्रीरमणचरणांच्या नखिंहुनी
असावें शंभूच्या निशिदिनिं जटाजूटभवनीं।
जपावें सर्वस्वें सतत पतितोद्धारकरणीं
नसावें कां माते ! तरि मग तुझें गौरव जनीं ? ॥ २१ ॥

ल. गो. विंझे—

जरी श्रीविष्णूच्या शुभपदनखीं उद्गम वसे
जरी अत्युच्चा त्या शिवशिरिं तुझा वासहि असे।
तरी तूं तारीशी हतपतित ऐशी नरतती
न कां राहो जागा तव जननि ! उत्कर्ष जगतीं ? ॥ २१ ॥

अर्थ : हे गंगामाते ! तुझा उगम लक्ष्मीपति श्रीविष्णूच्या चरणाच्या नखापासून आहे, आणि साक्षात्, श्रीशंकराच्या शिरोभागीं जटांच्या भवनांत तुझी वसति आहे. अशी ( अत्यंत उच्चपदस्थ असूनसुद्धां ) हीन दीन पाप्यांना उद्धरण्यास्तव तूं कष्टत असतेस; मग तुझा यशो-महिमा जगांत सदा जाग्रत कां राहणार नाहीं ?

—— ० ——

१५५९

जगन्नाथ पंडित—

नगेभ्यो यान्तीनां कथय तटिनीनां कतमया
पुराणां संहर्तुः सुरधुनि ! कपर्दोऽधिरुरुहे ? ।
कया वा श्रीभर्तुः पदकमलमक्षालि सलिलै-
स्तुलालेशो यस्यां तव जननि ! दीयेत कविभिः ॥ २२ ॥

वामन पंडित—

नद्या शैलांहूनी किति न निघती त्या क्षितितळीं
वदावें, शंभूच्या शिरिं गुरुपणें कोण जडली ? ।
स्वतोयें कोणें श्रीदयितचरणालागिं धुतलें ?
जियेशीं तोलावें तुज अशि न लेशाप्रति मिळे ॥ २२ ॥

ल. गो. विंझे—

गिरींतूनी ज्या ज्या निघति सरिता, त्यांतुनि कुणी
दुजी श्रीशंभूच्या शिरिं, वद, बसे काय चढुनी ? ।
जळें वा प्रक्षाळी हरिपद दुजी कोण सरिता ? –
जिला अल्पांशेंही तुजसि कविला येइ तुलितां ॥ २२ ॥

**अर्थ :** हे स्वर्गंगे जननि ! पर्वतांतून ज्या अनेक नद्या उगम पावतात, त्यांपैकीं एक तरी दुसरी अशी दाखव पाहूं कीं, जिनें श्रीशंकराच्या शिरीं आरोहण केलें आहे ? किंवा जिनें आपल्या जळानें श्रीपति विष्णूचें पद प्रक्षाळिलें आहे ? ( कोण अशी दुसरी नदी आहे ) कीं जिची अल्पांशानेंहि तुझ्याशीं, कवींना तुलना करितां यावी ?

———•———

जगन्नाथ पंडित —

विधत्तां निःशङ्कं निरवधिसमाधिं विधिरहो
सुखं शेते ? शेतां हरिरविरतं नृत्यतु हरः ।
कृतं प्रायश्चित्तैरलमथ तपोदानयजनैः
सवित्री कामानां यदि जगति जागर्षि जननि ! ॥ २३ ॥

वामन पंडित—

अनुष्ठो एकांतीं निरवधिसमाधीप्रति विधि
निजो शेषीं सौख्यें हरि; हर करो तांडवविधि ।
तपें कृच्छ्रें दानें उगलि यजमानासि न पवे
प्रदात्री कामांची जरि जगिं तुझी मूर्ति मिरवे ॥ २३ ॥

ल. गो. विंझे—

समाधी लावूं दे अनवरत निःशंक विधिला
सुखें झोंपे ? झोंपो हरि; सतत नाचो शिव भला ।
पुरे प्रायश्चित्तें, तप, यजन, दानें विफल तीं
जरी एका कामप्रद, असिसि तूं जागृतमति ॥ २३ ॥

**अर्थ** : सर्व कामना पूर्ण करणारी, एक तूं, गंगामाते ! जाग्रत असशील, तर ब्रह्मदेवाला म्हणावें, तूं खुशाल कालाच्या अंतापर्यंत समाधि लावून बैस. विष्णु सुखानें निजला आहे ? निजूं दे त्याला ( तसाच ). शंकराला म्हणावें तूं अखंड नृत्य करीत राहा. ( कारण उत्पत्ति, स्थिति, लय हीं कार्येंच गंगा उरूं देत नाहीं. ) म्हणून प्रायश्चित्तांची, किंवा, तप, दान, यजन यांचीहि आवश्यकता नाहीं.

—— o ——

जगन्नाथ पंडित—

अनाथः स्नेहार्द्रां विदलितगतिः पुण्यगतिदां
पतन् विश्वोद्धर्त्रीं गदविगलितः सिद्धभिषजम् ।
सुधासिन्धुं तृष्णाकुलितहृदयो मातरमयं
शिशुः संप्राप्तस्त्वामहमिह विदध्याः समुचितम् ॥ २४ ॥

वामन पंडित—

अनाथ स्नेहाळे; गतिविहिन मी, तूं सुगतिदा
जगोद्धारा तूं, मी पतित; गद मी तूं अरि गदा ।
सुधाब्धी तूं, मी जो तृषित अयि तूझा शिशु असा
तशा तूंतें आलों शरण; पथ योजीं उचितसा ॥ २४ ॥

ल. गो. विंझे—

दयार्द्रा तूं दीना; शुभगतिद तूं; मी हतगति
पडें मी, तूं तारीं; गद मज, नि तूं वैद्य सुमति ।
सुधासिंधू तूं, मी तृषित शिशु, माते! तुजप्रति
पहा मी आलों गे! समुचित इथें तूं कर कृति ॥ २४ ॥

**अर्थ** : मी अनाथ, तूं दयार्द्र; मी गति कुंठित झालेला, तूं शुभगति देणारी; मी पतन पावणारा, तूं विश्वोद्धारक; मी रोगांनीं पीडिलेला, तूं धन्वंतरि; मी तान्हेला, तूं सुधासागर; हे माते! मी बालक (तुझा आधार शोधीत) तुजपाशीं आलों आहें. आतां काय योग्य दिसेल तें या प्रसंगीं तूं कर.

—— o ——

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
क्रमांक ५६०८७ दि. ३१-५-७९
क्रमांक २२०६

जन्नगाथ पंडित—

विलीनो वै वैवस्वतनगरकोलाहलभरो
गता दूता दूरं क्वचिदपि परेतान्मृगयितुम् ।
विमानानां व्रातो विदलयति वीथीर्दिविषदां
कथा ते कल्याणी यदवधि महीमण्डलमगात् ॥ २५ ॥

वामन पंडित—

विराले निःशेषें यमनगरिंचे जे गलबले
पहाया प्रेतांतें अवनिं फिरती दूत उगले ।
विमानांच्या संघें विबुधपथ सोडी स्वनियमा
जसा आला भूमीं सुखकर तुझा कीर्तिमहिमा ॥ २५ ॥

ल. गो. विंझे—

निमाला तो सारा यमनगरकोलाहल दुरी
मृतां शोधायातें भटकति कुठें दूतहि तरी ।
विमानांची गर्दी पथनियम मर्दी सुरपुरीं
तुझी आली मुक्तिप्रद जधिं कथा या महिवरी ॥ २५ ॥

**अर्थ :** तुझी ही कल्याणकारक कथा, ज्या क्षणीं, या भूमितलावर अवतीर्ण झाली, त्या क्षणापासून, ( सर्वांना जन्ममरणांतून मुक्त करून तूं स्वर्गप्राप्ति करून दिल्यामुळें ) यमाच्या नगरांतील तो सारा गोंगाट पार लुप्त झाला आहे. यमदूतांना प्रेतें शोधण्यासाठीं दूर कोठेंतरी भटकावें लागत आहे; आणि स्वर्गांत येणाऱ्या विमानांच्या गर्दीनें, स्वर्गमार्गावरील रहदारी बंद पडण्याची वेळ आली आहे.

जगन्नाथ पंडित—

स्फुरत्कामक्रोधप्रबलतरसंजातजटिल-
ज्वरज्वालाजालज्वलितवपुषां नः प्रतिदिनम् ।
हरन्तां संतापं तमपि मरुदुल्लासलहरि—
च्छटाचञ्चत्पाथःकणसरणयो दिव्यसरितः ॥ २६ ॥

वामन पंडित—

स्फुरे कामक्रोधज्वर बहु करालार्चिक बनीं
जळे तेणें काया, जननि ! अमुची ही प्रतिदिनीं ।
महोर्मींच्या योगें उसळति तुझे तोयकण ते
तया संतापातें शमवुत अहो देवसरिते ! ॥ २६ ॥

ल. गो. विंझे—

मनीं कामक्रोधज्वर भडकुनी ज्या उसळती
प्रचंड ज्वाला त्या सतत तनुचा दाह करिती ।
तुषारश्रेणी त्वज्जलिं, पवन जी दे उधळुनी
हरो ती त्या तापा, सकल, अमुच्या, हे सुरधुनि ! ॥ २६ ॥

**अर्थ** : हे स्वर्गंगे ! कामक्रोधादींचा ज्वर मनांत भडकून, अनावर होऊन, त्याच्या ज्या भयंकर ज्वाळा उठतात, त्यांमुळें, प्रत्यहीं आमच्या शरीरांचा दाह चालू आहे. वाऱ्याच्या लीलेमुळें, तुझ्या जळांतून ज्या तुषारश्रेणी उधळल्या जातात, त्या, आमचा तो दाह, शांत करोत.

जगन्नाथ पंडित—

इदं हि ब्रह्माण्डं सकलभुवनाभोगभवनं
तरङ्गैर्यस्यान्तर्लुठति परितस्तिन्दुकमिव ।
स एष श्रीकण्ठप्रविततजटाजूटजटिलो
जलानां संघातस्तव जननि ! तापं हरतु नः ॥ २७ ॥

वामन पंडित—

अहो हे ब्रह्मांडाकृति सकल लोकांसह बरी
रुळे जेथें ऊर्मिभ्रमणविवशें तिंदुकपरी ।
असा तो हा मृत्युंजयपृथुकपर्दीं जडिनला
तुझा श्रीतोयौघ प्रशमन करू पापवहिला ॥ २७ ॥

ल. गो. विंझे—

जया ब्रह्मांडीं या सकलजगविस्तार भरले
तुझ्या लाटांनीं तें तव जळिं जणूं तिंदुक डुले ।
जटांच्या विस्तारीं बहु, शिवशिरीं जो अटकला
जलांचा तो सांठा तव, मम हरो ताप सगळा ॥ २७ ॥

**अर्थ :** अखिल भुवनांचे विस्तार ज्याच्या पोटांत मावतात, तें ब्रह्मांडसुद्धां, ज्या तुझ्या पाण्यांत, लाटांनीं इकडे तिकडे, एखाद्या क्षुद्र टेंभुरणीच्या फळाप्रमाणें डुलत असतें, आणि शंकरानें अतिशय पसरलेल्या जटांमुळें जो रुद्ध झाला आहे, तो तुझ्या पाण्याचा सांठा ( धो धो वाहून ) हे माते ! आमचा ताप हरण करो !

— ० —

जगन्नाथ पंडित—

त्रपन्ते तीर्थानि त्वरितमिह यस्योद्धृतिविधौ
करं कर्णे कुर्वन्त्यपि किल कपालिप्रभृतयः ।
इमं तं मामम्ब त्वमियमनुकम्पार्द्रहृदये
पुनाना सर्वेषामघमथनदर्पं दलयसि ॥ २८ ॥

वामन पंडित—

जयाच्या उद्धाराविषयिं बहु तीर्थेंहि पळती
स्वकानीं हस्तातें मग सुर शिवादीक धरिती ।
असा मी, त्या मातें पुनित करिशी तूं जननिये
जनीं पापघ्नांच्या हरिसि गुरुगर्वास सदये ॥ २८ ॥

ल. गो. विंझे—

जयाच्या उद्धारीं त्वरित जगिं तीर्थें शरमती
करा कानीं ठेवी सुरगण महादेवप्रभृति ।
असा जो मी त्याचा सदयमति ! उद्धार करिशी
तयानें सर्वांच्या अघमथनगर्वास हरिशी ॥२८॥

अर्थ : [ ज्याचीं भयंकर पापें पाहून ] ज्याचा उद्धार करण्याच्या बाबतींत ( स्वतःला तें साधणें अशक्य याची जाणीव होऊन ) जगांतील तीर्थक्षेत्रें त्वरित शरमून जातात; आणि साक्षात् शंकरादि देवहि कानावर हात ठेवतात; अशा मला, हे दयार्द्रहृदये आई ! तूं पावन करतेस; आणि त्यामुळें, पापनाश करण्याविषयींचा सर्वांचा गर्व हरण करतेस.

जगन्नाथ पंडित—

श्वपाकानां व्रातैरमितविचिकित्साविचलितै—
र्विमुक्तानामेकं किल सदनमेनःपरिषदाम् ।
अहो मामुद्धर्तुं जननि ! घटयन्त्याः परिकरं
तव श्लाघां कर्तुं कथमिव समर्थो नरपशुः ? ॥ २९ ॥

वामन पंडित—

श्वपाकांच्या श्रेणीहुनि बहुत नीचांत गणना
न मर्यादा पापां, अघसदन मी एकचि म्हणा ।
अशाला ताराया कटि कसुनि होसी निज, सखे !
कशी तूझी श्लाघा द्विपदपशु जो तो करुं शके ? ॥ २९ ॥

ल. गो. विंझे—

बहू चर्चेअंतीं चलितमन नीचें त्यजियलीं
अशीं भारी पापें घर करिति माझ्यांत सगळीं ।
अशाही ताराया असासि कटिबद्धा ! तव अहा !
यथार्थत्वें कैसा स्तुति करुं शके मूढ नर हा ? ॥ २९ ॥

अर्थ : ( " करावीं कीं नाहीं ? " याविषयीं ) पुष्कळ चर्चा करून, निश्चय न झाल्यानें, जीं पापें, अनेक चांडालहि करूं धजले नाहींत, अशा अनेक पापांचें जणुं माहेरघर असा जो मी, त्या माझाहि उद्धार करण्यास कंबर बांधून सिद्ध असणाऱ्या तुझी, यथार्थ स्तुति, मूर्ख मानवप्राणी कसा करूं शकेल ?

जगन्नाथ पंडित—

न कोऽप्येतावन्तं खलु समयमारभ्य मिलितो
यदुद्धारादाराद्भवति जगतो विस्मयभरः ।
इतीमामीहां ते मनसि चिरकालं स्थितवती—
मयं संप्राप्तोऽहं सफलयितुमम्ब ! प्रणयतः ॥ ३० ॥

वामन पंडित—

" न कोणीही ऐसा अजवरि मला प्राप्त जन, कीं—
जयाच्या उद्धारें अखिल अवनी मस्तक तुकी " ।
अशी इच्छा पोटीं बहु दिवस होती तव, तिला
कराया मी आलों सफल, समजो भाव तुजला ॥ ३० ॥

ल. गो. विंझे—

" मिळाला ना कोणी मज जन असा आजवर, कीं—
यदुद्धारें व्हावी चकित पृथिवी तत्क्षण निकी । "
अशी ही जी इच्छा बहुत दिवसांची तव मनीं
पहा आलों मी, ती सफल करण्या; प्रेम धरुनी ॥ ३० ॥

अर्थ : " ज्याचा उद्धार ( करण्याचा विक्रम ) करून साऱ्या जगाला, तत्क्षणीं, आश्चर्यचकित करतां येईल, असा ( महापापी ) माणूस मला आजवर कोणी भेटलाच नाहीं; " अशी जी खुमखुमी फारां दिवसांची तुझ्या मनांत आहे ती जिरविण्यासाठीं, आई ! हा मी, प्रेमानें, तुझ्यापाशीं आलों आहें.

— ० —

जगन्नाथ पंडित—

श्ववृत्तिव्यासङ्गो नियतमथ मिथ्याप्रलपनं
कुतर्केष्वभ्यासः सततपरपैशुन्यमननम् ।
अपि श्रावं श्रावं मम तु पुनरेवं गुणगणा—
नृते त्वत्को नाम क्षणमपि निरीक्षेत वदनम् ? ॥ ३१ ॥

वामन पंडित—

स्वभाव श्वानाचा, तदुपरि असत्यार्थ वदनीं
कुतर्का घोकावें, अवडि परपैशुन्यमननीं ।
असे माझे दोषप्रचुर गुण कानीं परिसुनी
मुखा पाहे कोण क्षणहि तुजवांचूनि, जननि ? ॥ ३१ ॥

ल. गो. विंझे—

प्रवृत्ति श्वानाची, अनृत वदणें नित्य वदनीं
दुज्यांचा दुष्टावा–सतत करणें–तर्कट जनीं ।
गुणांची सत्कीर्ती (!) पुनरपि पुन्हां ही परिसुन
तुझ्यावीणें कोण, क्षणहि मम पाहील वदन ? ॥ ३१ ॥

अर्थ : कुत्र्यासारखी प्रवृत्ति, नेहमीं खोटें बोलणें, सदा तर्कटीपणा, परक्यांचा नित्य दुष्टावा करणें या सर्व माझ्या गुणसंघाची कीर्ति (!) वारंवार ऐकून क्षणभरसुद्धां माझें तोंड पाहील असें, तुझ्यावांचून दुसरें कोण आहे ?

जगन्नाथ पंडित—

विशालाभ्यामाभ्यां किमिह नयनाभ्यां खलु फलं
न याभ्यामालीढा परमरमणीया तव तनुः ।
अयं हि न्यक्कारो जननि ! मनुजस्य श्रवणयो—
र्ययोर्नान्तर्यातस्तव लहरिलीलाकलकलः ॥ ३२ ॥

वामन पंडित—

वृथा ते मोठेही नयन तुझि ज्यांहीं तनु कधीं
विलोकीली नाहीं जरि जननि लावण्यउदधि ।
न वर्णावें त्याला अधमनरकर्णाकृति बिळा
न ऐकीला जींही मधुर तव लीलागलबला ॥ ३२ ॥

ल. गो. विंझे—

असोनी हे मोठे नयन, फल तें काय मनुजा ?
प्रकर्षें रम्या ती तव न दिसली मूर्ति कधि ज्यां ।
घृणा वाटे कर्णांप्रति, न शिरली ज्यांत कधि ती
तुझ्या लाटांची, हे जननि ! अति मंजु ध्वनितती ॥ ३२ ॥

**अर्थ** : तुझ्या परम सुंदर देहाचें, ज्यांना कधींच दर्शन घडलें नाहीं, ते डोळे मोठे असून, जगांत, काय उपयोग आहे ? आई ! ज्या मानवी कानांमध्यें तुझ्या लाटांचा मृदुमंजुध्वनि कधीं शिरला नाहीं, त्या कर्णांचा तिरस्कार ( धिक्कार ) करावा तितका थोडाच आहे.

जगन्नाथ पंडित—

विमानैः स्वच्छन्दं सुरपुरमयन्ते सुकृतिनः
पतन्ति द्राक् पापा जननि ! नरकान्तः परवशाः ।
विभागोऽयं तस्मिन्नशुभमयमूर्तौ जनपदे
न यत्र त्वं लीलादलितमनुजाशेषकलुषा ॥ ३२ ॥

वामन पंडित—

घडे ज्यांना पुण्याचरण तिंहिं जावें सुरपुरीं
पडावें पापिष्ठीं विषमनरकीं घोर विवरीं ।
व्यवस्था ऐशी हे अशुभमय देशांतचि असे —
तुझी लीला जेथें सकलअघहर्त्री न विलसे ॥ ३२ ॥

ल. गो. विंझे—

विमानीं स्वच्छंदें सुकृति सुरलोकास उडती
झणीं पापात्मे ते अगति नरकामाजिं पडती ।
परी हें सारें त्या अशुभमय देशींच घडतें —
तुझी मूर्ती जेथें सकलअघनाशी न वसते ॥ ३२ ॥

अर्थ : पुण्याचरण करणारांनीं, स्वच्छंदें विमानांनीं स्वर्गास जावयाचें, व, पापात्म्यांनीं अगतिकपणें त्वरित नरकांत पडावयाचें; ही जी वांटणी आहे, ती, केवळ, लीलेनें मनुजांचें सर्व पाप नष्ट करणारी तुझी मूर्ति जेथें नाहीं, अशा, अशुभ देशांतच केली जाते. ( तूं असशील तेथें सर्वांना स्वर्गच मिळावयाचा असतो. )

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

अपि घ्नन्तो विप्रानविरतमुशन्तो गुरुसतीः
पिबन्तो मैरेयं पुनरपि हरन्तश्च कनकम् ।
विहाय त्वय्यन्ते तनुमतनुदानाध्वरजुषा —
मुपर्यम्ब ! क्रीडन्त्यखिलसुरसंभावितपदाः ॥ ३४ ॥

वामन पंडित—

वधीती विप्रांतें, सतत गुरुदारानिरत जे
हरावें स्वर्णातें, मलिन मदिरापानहि किजे ।
महत्पापी ऐसे त्यजिति निजदेहां तव तिरीं
करीती क्रीडा ते कृतमखनरांहूनि उपरी ॥ ३४ ॥

ल. गो. विंझे—

द्विजां जे मारीती, करिति गुरुपत्नीशिं कुरति
पिती मद्यातें, जे कनक हरिती; अंतिं त्यजिती —।
शवा त्वत्स्रोतीं, त्यां अखिलसुरसन्मानितचि, जें —
मिळे दानें यज्ञें, पद मिळतसे त्याहि वरचें ॥ ३४ ॥

**अर्थ** : ब्रह्महत्या करणारे, स्वगुरूच्या पत्नीची अभिलाषा धरणारे, मद्यपान करणारे, परधनापहरण करणारे, अशा सर्व तऱ्हेच्या पापी लोकांचीं, मेल्यानंतर नुसतीं प्रेतें जरी तुझ्या पाण्यांत पडलीं, तरी, आई ! तेवढ्यानें, मोठीं दानें, यज्ञ केल्यानें जें पद मिळावयाचें, त्याहून वरचें, अखिलसुरवंदित असें पद त्यांना प्राप्त होतें. ( शब्दशः– ते महादानयज्ञ करणारांच्या वर क्रीडा करतात )

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

अलभ्यं सौरभ्यं हरति नियतं यः सुमनसां
क्षणादेव प्राणानपि विरहशस्त्रक्षतहृदाम् ।
त्वदीयानां लीलाचलितलहरीणां व्यतिकरात्
पुनीते सोऽपि द्रागहह ! पवमानस्त्रिभुवनम् ॥ ३५ ॥

वामन पंडित—

सुगंधा पुष्पांच्या हरण नियमें संतत किजे
वियोगाच्या शस्त्रें क्षत हरिति तत्प्राणहर जे ।
असा वायू तूझा चलितलहरीयोगविभवें
स्वसंचारें माते ! करि भुवन हें शुद्ध अवघें ॥ ३५ ॥

ल. गो. विंझे—

फुलांच्या गंधातें हरुनि नित जो चौर्य करितो
वधोनी जो वायू विरहिजन, हत्याहि करितो ।
असा पापी तोही तव लहरिसंपर्क मिळुनी
करी त्रैलोक्यातें विमल ! किति आश्चर्य, जननि ! ॥ ३५ ॥

अर्थ : फुलांतील दुर्मिळ सुगंधाचें हरण करून जो नेहमीं चौर्य करतो; विरहशस्त्रांनीं व्याकुळ झालेल्यांचे प्राण, क्षणाभरांत हरण करून, हत्येचेंहि पातक करतो; असा महापापी वायूसुद्धां केवळ तुझ्या हलत्या लाटांचा संपर्क मिळाल्यानें, अहाहा ! त्रिभुवनाला त्वरित पावन करतो, [ ही केवढी आश्चर्याची गोष्ट आहे ! ]

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

कियन्तः सन्त्येके नियतमिहलोकार्थघटकाः
परे पूतात्मानः कति च परलोकप्रणयिनः ।
सुखं शेते मातस्तव खलु कृपातः पुनरयं
*जगन्नाथः शश्वत्त्वयि निहितलोकद्वयभरः ॥ ३६ ॥

वामन पंडित—

किती या लोकाच्या स्थितिस सुमती सांग करिती
पवित्रात्मे कोणी सतत परलोकास जपती ।
कृपापांगें तूझ्या सुखरुप निजें मी धणिवरी
समर्पूनी लोकद्वय, जननि ! चिंता तुजवरी ॥ ३६ ॥

ल. गो. विंझे—

किती या लोकींचें निजजननची सार्थ करिती
दुजे शुद्धाचारें प्रणय परलोकार्थ धरिती ।
सुखानें ठेवोनी तुजवरि जगन्नाथ परि हा
द्विलोकांच्या भारा, चिर तव कृपें निद्रित पहा ॥ ३६ ॥

* यांत जगन्नाथ या शब्दावर कोटि आहे ती व्यक्त करण्यासाठीं शेवटच्या दोन ओळींचें भाषांतर असेंहि करतां येईल—

परी दो लोकांचा भर तुजवरी टाकुनि अहा !
जगाचा हा नाथ, प्रमुदित सदा निद्रित पहा ॥

अर्थ : हे माते ! कित्येक लोक या लोकांतील आपल्या जीवनापुरतें सार्थक करण्यास झटत असतात, तर इतर कांहीं पवित्राचरण करून परलोकाची आवड धरतात. परंतु मी हा जगन्नाथ [ जगाचा नाथ; इतर ] दोन्ही लोकांचा भार तुजवर टाकून, तुझ्या कृपेनें, सुखानें, सदाचा निजलेला आहे.

जगन्नाथ पंडित—

भवत्या हि व्रात्याधमपतितपाखण्डपरिषत्-
परित्राणस्नेहः श्लथयितुमशक्यः खलु यथा ।
ममाप्येवं प्रेमा दुरितनिवहेष्वम्ब ! जगति
स्वभावोऽयं सर्वैरपि खलु यतो दुष्परिहरः ॥ ३७ ॥

वामन पंडित—

जगीं जे कां व्रात्यादिक अधम देह प्रकटले
तयां रक्षावें ही अविट करुणा तूज न टळे ।
सुटेना तैसेंची दुरितविषयीं प्रेम मज कीं
स्वभावातें कोणी त्यजि जनिं अशी गोष्ट लटकी ॥ ३७ ॥

ल. गो. विंझे—

असंस्कारी–पापी–अधम–खल–उद्धारकरणीं
जसा तूतेंही ना प्रणय सुटणें शक्य जननि ! ।
तसा पापांचाही प्रणय मज सोडीच कधिं ना
स्वभावा सोडावें अति कठिण हें सर्वहि जना ॥ ३७ ॥

अर्थ : असंस्कारी, अधम, पतित, पाखंडी अशांचा उद्धार करण्याविषयींचें तुझें प्रेम शिथिल करणें, जसें तुला शक्य नाहीं; तसेंच हे माते! पापाविषयींचें माझें प्रेमहि मला सुटतां सुटणार नाहीं. कारण स्वभाव सोडणें, हें सर्वांनाच अति कठिण पडतें.

**जगन्नाथ पंडित—**

प्रदोषान्तर्नृत्यत्पुरमथनलीलोद्धृतजटा—
तटाभोगप्रेङ्खल्लहरिभुजसंतानविधुतिः ।
बिलक्रोडक्रीडज्जलडमरुटङ्कारसुभग—
स्तिरोधत्तां तापं त्रिदशतटिनीताण्डवविधिः ॥ ३८ ॥

**वामन पंडित—**

जटा शंभूनृत्यें हळुंच हलती, वीचिहि मधीं—
तुझ्या, तेची जाणों भुज करिति लास्योचित विधि ।
महादोलें वाजे जळनिकर जो, तोच डमरू
असा तूझा नृत्योत्सव जननि ! तापाप्रति हरू ॥ ३८ ॥

**ल. गो. विंझे—**

प्रदोषीं नाचे, तैं शिव सहज उंचावित जटा
तुझ्या धारा तेणें मिरविति भुजांची ललितता ।
कपारीं लाटांचा ध्वनि डमरुसाम्यें घुमतसे
हरो तापा, नृत्यप्रचुर तव तें तांडव तसें ॥ ३८ ॥

**अर्थ :** प्रदोषसमयीं नाचतांना, शिवानें आपल्या जटा उचलून धरल्यानें जिच्या लाटा ( धारा ), ( नाचणाऱ्या स्त्रीच्या लालित्ययुक्त ) भुजांच्याप्रमाणें हालचाली करीत आहेत, ( व त्याला जणुं ताल धरण्यासाठीं, किनाऱ्यावरील ) कपारींमध्यें घुमणाऱ्या जिच्या लाटांचा ध्वनि, हा जणुं डमरूचा कडकडाट होत असल्यानें, शोभून दिसणारें, असें, स्वर्गंगेचें तें तांडवनृत्य, आमचा ताप हरण करो.

जगन्नाथ पंडित—

सदैव त्वय्येवार्पितकुशलचिन्ताभरमिमं
यदि त्वं मामम्ब ! त्यजसि समयेऽस्मिन्सुविषमे ।
तदा विश्वासोऽयं त्रिभुवनतलादस्तमयते
निराधारा चेयं भवति खलु निर्व्याजकरुणा ॥ ३९ ॥

वामन पंडित—

तुझे ठायीं ठेवीं निजकुशलचिंता निशिदिनीं
तया मातें जेव्हां त्यजिसि विषमीं विश्वजननि ! ।
अनाथस्नेहाळे ! त्रिजगिं तयिं विश्वासचि बुडे
निराधारी झालें सहज मग कारुण्य उघडें ॥ ३९ ॥

ल. गो. विंझे—

सदाची टाकीं मी मम कुशलचिंता तुजवरी
मला आतां तूं या कठिणसमयीं सोडसि, तरी — ।
तुझा हा विश्वास त्रिजगभर जाईल विलया
ठरे खोटी सारी अकपट अशी ही तव दया ॥ ३९ ॥

**अर्थ** : आई ! माझ्या कुशलाची सर्व काळजी, मी सदासर्वकाळ एकट्या तुझ्यावर टाकून राहिलों असतां, जर, या कठिणसमयीं, तूंच मला सोडून देणार असशील, तर, साऱ्या त्रिभुवनांतून तुझ्यावरचा विश्वास उडून जाईल, आणि तुझी दया अत्यंत अकपट असते, ही गोष्टहि निराधार वाटूं लागेल, ( याचा विचार कर. )

जगन्नाथ पंडित—

कपर्दादुल्लस्य प्रणयमिलदर्धाङ्गयुवतेः
पुरारेः प्रेङ्खन्त्यो मृदुलतरसीमन्तसरणौ ।
भवान्या सापत्न्यस्फुरितनयनं कोमलरुचा
करेणाक्षिप्तास्ते जननि ! विजयन्तां लहरयः ॥ ४० ॥

वामन पंडित—

आलिंगी जैं प्रेमें गिरिश शिरिं जैशी नतशिरे
शिरीं अंबेच्या तें जंव लहरिचें नीर उतरे ।
तयातें हस्ताब्जें असुडि नगभू रक्तनयना
अशी सापत्न्याची विदित तव लीला त्रिभुवना ॥ ४० ॥

ल. गो. विंझे—

जटांतूनी जेव्हां प्रणयरतगौरीशुभशिरीं
मृदूशा सीमंतीं उतरति तुझ्या नीरलहरी ।
कराब्जें ती झाडी, स्फुरत सवतीभाव नयनीं
अशा त्या लाटांचा तव, जय असो नित्य जननि ! ॥ ४० ॥

अर्थ : शंकराच्या जटांतून उडी घेऊन खालीं येतांना, त्याच्या अर्धांगीं बसलेल्या, प्रणयरत पार्वतीच्या, मृदुलशा भांगांत, जेव्हां, तुझें पाणी पडलें, तेव्हां सवतीभावानें, डोळे वटारून, ज्या तुझ्या लहरींना, तिनें आपल्या कोमल हातानें निपटून झाडून टाकिलें, त्या तुझ्या लाटांचा, हे माते ! विजय असो.

जगन्नाथ पंडित—

प्रपद्यन्ते लोकाः कति न भवतीमत्रभवती—
मुपाधिस्तत्रायं स्फुरति यदभीष्टं वितरसि ।
शपे तुभ्यं मातर्मम नु पुनरात्मा सुरधुनि !
स्वभावादेव त्वय्यमितमनुरागं विधृतवान् ॥ ४१ ॥

वामन पंडित—

शरण्ये लोकांला शरण तुज येथेंच करणें
उपाधि व्यासंगास्तव पर-अभीष्टा वितरणें ।
मदात्मा हा माते ! शपिल तुज निष्पाप वदतों
स्वभावें त्वद्रूपीं अतुल अनुरागासि धरितो ॥ ४१ ॥

ल. गो. विंझे —

किती येती तूतें जन शरण, त्यांची न गणति
अभीष्टा देशी हा हृदयिं परि जे [ स्वार्थ ] हेतु धरिती ! ।
मदात्मा स्वर्गंगे ! परि शपथ घेऊन कथितों—
स्वभावेंची तूतें अमित अनुरागास धरितो ॥ ४१ ॥

अर्थ : आई, या जगांत तुला किती लोक शरण येतात याची खरोखर गणतीच नाहीं. पण " तूं अभीप्सित देणारच, " हा ( स्वार्थी ) हेतु पोटांत धरूनच ते येतात. पण हे स्वर्गंगे, मी, शपथपूर्वक तुला सांगूं शकतों, कीं, माझ्या अंतरात्म्याला मात्र, तुझ्याविषयीं स्वभावतःच अत्यंत ( निःस्वार्थ ) प्रेम वाटत आलें आहे. ( इतर शरणागतांसारखें, " तूं अभीष्ट देशील " या अपेक्षेनें नव्हे. )

जगन्नाथ पंडित—

ललाटे या लोकैरिह खलु सलीलं तिलकिता
तमो हन्तुं धत्ते तरुणतरमार्तण्डतुलनाम् ।
विलुम्पन्ती सद्यो विधिलिखितदुर्वर्णसरणिं
त्वदीया सा मृत्स्ना मम हरतु कृत्स्नामपि शुचम् ॥ ४२ ॥

वामन पंडित—

जिला एके काळीं जन निजकपाळीं तिलकितां
हरे दुर्वर्णाची लिपि जिस विधी सुज्ञ लिहितां ।
तमाच्या जे नाशाविषयिं धरि मार्तंड उपमा
अशी तूझी माती मम परिहरू शोकगरिमा ॥ ४२ ॥

ल. गो. विंझे—

ललाटीं लीलेनें तिलक करितां पाप हरिते
तमोनाशामध्यें प्रखर रविशीं तुल्य ठरते ।
पुसोनी टाकी जी विधिलिखित सारें अशुभ तें
तुझी माती नाशो मम सकल शोका शुभमते ! ॥ ४२ ॥

**अर्थ** : अंधाराचा नाश करण्याची, जी शक्ति प्रखर सूर्य दाखवितो, तिची बरोबरी जी तुझी माती, सहज कपाळीं लावली असतां, पापनाश करण्यांत करून दाखविते; आणि जी ( कपाळीं चर्चिली असतां ) अशुभ विधिलिखितहि त्वरित पुसून टाकते, ती तुझी माती माझा सर्व शोक हरण करो.

जगन्नाथ पंडित —

नरान्मूढांस्तत्तज्जनपदसमासक्तमनसो
हसन्तः सोल्लासं विकचकुसुमव्रातमिषतः।
पुनानाः सौरभ्यैः सततमलिनो नित्यमलिनान्
सखायो नः सन्तु त्रिदशतटिनीतीरतरवः ॥ ४३ ॥

वामन पंडित —

सुजन्मा पावोनी नरपशु कुदेशांत रमती
तयां पुष्पव्याजें हंसुनि अगतीतें सुचविती।
स्वसौगंधें नित्य भ्रमरकुलमालिन्य हरिते
घडो ऐशा तूझ्या पुलिनतरुंचें सख्य अमुतें ॥ ४३ ॥

ल. गो. विंझे —

'अगंगा' देशीं जे स्वगृहरतिनें मूढ रमती
फुलांच्या रूपें, त्यां, जणुं विकट जे वृक्ष हंसती।
सुगंधें, भृंगांतें सततमलिनां, शुद्ध करिती
घडो मैत्री आम्हां, तटगततरूंशीं तव अति ॥ ४३ ॥

अर्थ : ( ज्या देशांत, मुक्तिदायी गंगा नाहीं, अशा (देशांत) स्वतांच्या ( देशाच्या ) घराच्या प्रीतीनें ( 'तातस्य कूपोऽयम्' इति वृत्तीचे ) जे मूढ जन रमतात व ( मुक्तिविना मरतात ) त्यांना, जे वृक्ष, स्वतांच्या फुललेल्या फुलांच्या मिषानें, जणू विकट हंसतात ( तिरस्कारतात ), तसेंच नित्य मलिन भुंग्यांना जे स्वसुगंधानें पवित्र करतात, त्या स्वर्गंगातीरावरील वृक्षांशीं आमची मैत्री होवो.

जगन्नाथ पंडित—

यजन्त्येके देवान्कठिनतरसेवांस्तदपरे
वितानव्यासक्ता यमनियमरक्ताः कतिपये।
अहं तु त्वन्नामस्मरणकृतकामस्त्रिपथगे!
जगज्जालं जाने जननि! तृणजालेन सदृशम् ॥ ४४ ॥

वामन पंडित—

महाकष्टें सेवा करुनि, किति देवांसि भजती
दुजे यज्ञीं निष्ठा, कितिक मन योगें दमविती।
परी मी तो तूझ्या स्मरणपरितोषेंचि फुगुनी
जगातें या लेखीं तृणसम अवो! विश्वजननि! ॥ ४४ ॥

ल. गो. विंझे—

व्रतें भारी, ऐश्यां, भजति कुणि देवां; परि कुणी
धरी योगीं श्रद्धा; इतर रत इच्छानियमनीं।
परी मी त्वन्नामा स्मरुनि कृतकामार्थ बनुनी
जगज्जाला साऱ्या गणित तृणजालापरि मनीं ॥ ४४ ॥

अर्थ : तिन्ही लोकांतून वाहणाऱ्या हे सरिते! कित्येक, लोक, ज्यांची सेवा, पूजा महाकठिण, अशा देवांना पूजितात; दुसरे कित्येक यज्ञ करीत बसतात; आणखी कुणी योगाचा आश्रय करितात. परंतु आई! मी मात्र केवळ तुझ्या नामस्मरणानेंच स्वतःला कृतकृत्य समजून, साऱ्या भव-जालाला तृणजालप्रमाणें तुच्छ गणितों!

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

अविश्रान्तं जन्मावधि सुकृतमात्रं कृतवतां
सतां श्रेयः कर्तुं कति न कृतिनः सन्ति विबुधाः ।
निरस्तालम्बानामकृतसुकृतानां तु भवतीं
विनाऽमुष्मिँल्लोके न परमवलोके हितकरम् ॥ ४५ ॥

वामन पंडित—

सुकर्में जे जन्मप्रभृति विधिनें नित्य करिती
तयां संरक्षाया कितिक सुर हे दक्ष असती ।।
परंतू जे पापी सहजचि अनाधार कुमति
अशांला ताराया तुजविण दिसेना परगति ॥ ४५ ॥

ल. गो. विंझे—

उभ्या जन्मीं जे कां सुकृतचि अविश्रांत करिती
अशांच्या कल्याणा सुर कितितरी सज्ज असती ! ।
निरालंबी, केलें सुकृत न, अशांचें हित करी
जगीं ऐसें मातें तुजविण दिसेना कुणि परी ॥ ४५ ॥

अर्थ : जे लोक साऱ्या जन्मभर, अविश्रांत, सत्कर्मेंच करतात, त्यांचें कल्याण करण्यासाठीं कार्यपर असलेले अनेक देव आहेत. परंतु ज्यांनीं कधींच पुण्य जोडलें नाहीं, व, म्हणून, ज्यांना कसलाच कोणाचा आधार नाहीं, अशांचें हित करणारें मात्र, तुझ्यावांचून या जगांत दुसरें कोणी दिसत नाहीं.

जगन्नाथ पंडित—

पयः पीत्वा मातस्तव सपदि यातः सहचरै—
र्विमूढैः संरन्तुं क्वचिदपि न विश्रान्तिमगमम् ! ।
इदानीमुत्सङ्गे मृदुपवनसंचारशिशिरे
चिरादुन्निद्रं मां सदयहृदये ! शायय चिरम् ॥ ४६ ॥

वामन पंडित—

पया तूझ्या माते ! पिउन शिशुभावें मतिहिनां—
सवें क्रीडे गेलों, अधिक घडलें दुःखचि मना ।
निजोत्संगीं आतां निजविं मज वो स्वस्थ, जननि !
सुखस्पर्शीं तापा हरि पवन जेथें अनुदिनीं ॥ ४६ ॥

ल. गो. विंझे—

खुळ्या मित्रांसंगें, तव पय पिऊनी झडकरीं
पळें मी खेळाया, नच मिळत शांति क्षणभरी ! ।
तुझ्या तीरोत्संगीं, जिथ पवन शीतत्व पसरी
—कधींचा मी जागा—मज सुचिर तूं निद्रित करीं ॥ ४६ ॥

अर्थ : आई ! तुझें पयःपान करून, घाईघाईनें, मी माझ्या खुळ्या संवगड्यांबरोबर, खेळण्यासाठीं, निघून गेलों, परंतु, मला कुठेंहि विश्रांति मिळाली नाहीं. कधींचा मी जागा आहें. आतां हे सदयहृदये ! मृदुमंद वायूनें शीतल अशा तुझ्या तीररूपी मांडीवर मला पुष्कळ वेळ ( चिरकालचा ) निजव.

जगन्नाथ पंडित—

बधान द्रागेव द्रढिमरमणीयं परिकरं
किरीटे बालेन्दुं नियमय पुनः पन्नगगणैः ।
न कुर्यास्त्वं हेलामितरजनसाधारणतया
* जगन्नाथस्यायं सुरधुनि ! समुद्धारसमयः ॥ ४७ ॥

वामन पंडित—

कटीं बांधी आधीं, वरि अवरिं वेगें परिकरा
ललाटीं संरक्षीं दृढ उरगबंधें शशधरा ।
न कीजे त्वां हेला इतरजनसादृश्य धरुनी
जगन्नाथाचा हा गतिसमय सांभाळिं जननि ! ॥ ४७ ॥

ल. गो. विंझे—

झणीं घे बांधोनी, परिकर तुझा सुंदर, कटीं
पुन्हां तूं सर्पांनीं दृढ जखड बालेंदु मुकुटीं ।
उपेक्षी ना माते ! इतरजन मातें समजुनी
जगन्नाथा मुक्तिप्रद समय हा प्राप्त जननि ! ॥ ४७ ॥

* यांतहि जगन्नाथ शब्दावर कोटि आहे; ती व्यक्त करण्यासाठीं चौथी ओळ अशीहि करतां येईल —

जगाच्या नाथाचा, बघ समयिं या मोक्ष जननि !

**अर्थ** : हे स्वर्गंगे! तुझें तें सुंदर वस्त्र ( किंवा कंबरपट्टा ) लौकर ( कटी-भोंवतीं ) आवरून बांध; पुन्हां ती चंद्राची कोर आपल्या मुकुटामध्यें सर्परज्जूंनीं घट्ट आवळ. मला कुणीतरी अलबत्या गलबत्या समजून या प्रसंगाची तूं उपेक्षा करूं नको. कारण ( प्रत्यक्ष ) जगन्नाथाचा ( जगांतील सर्वांत पापी माणसाचा ) ( दुसरा अर्थ — जगाच्या नाथाचा ) मोक्ष होण्याचा आजचा हा समय आहे.

जगन्नाथ पंडित—

शरच्चन्द्रश्वेतां शशिशकलशुभ्राङ्कमुकुटां
करैः कुम्भाम्भोजे वरभयनिरासौ च दधतीम्।
सुधाधाराकाराभरणवसना शुभ्रमकर—
स्थितां त्वां ये ध्यायन्त्युदयति न तेषां परिभवः ॥ ४८ ॥

वामन पंडित—

शरीरीं चंद्राभा, विशद शशिशोभा सुमुकुटीं
धरी कुंभा, पद्मा, वर अभय चारी करपुटीं ।
पटीं पीयूषाची रुचि; रुचिर संस्थान मकरीं
अशा तूतें ध्याती, नरवर, न त्यां दुर्गति करीं ॥ ४८ ॥

ल. गो. विंझे—

तनू चंद्रश्वेता; मुकुटिंहि विराजे शशिकला
धरी चारी हातीं वर, अभय, कुंभा, नि कमला ।
असे जी आरूढा, धवलवसना, श्वेतमकरीं
अशा तूतें ध्याती, परिभव कधीं त्यांस न वरी ॥ ४८ ॥

**अर्थ :** शरच्चंद्रासारखी देहकांति; चंद्रकलेनें झगझगणारा मुकुट; वर ( दान ), अभय ( दान ) कुंभ आणि कमल या चार वस्तु चार हातांत धारण करणारी, अमृतधारेप्रमाणें झुळझुळीत शुभ्र वस्त्राभरणांनीं आवृत व शुभ्र मगरीवर बसलेली, अशा तुझ्या मूर्तीचें जे ध्यान करतात, त्यांना पराभव प्राप्त होत नाहीं.

पं. ४



शरच्चन्द्रश्वताम् …     श्लोक ४८

जगन्नाथ पंडित—

पृथ्वी

दरस्मितसमुल्लसद्वदनकान्तिपूरामृतै—
र्भवज्वलनभर्जितानानिशमूर्जयन्ती नरान् ।
चिदेकमयचन्द्रिकाचयचमत्कृतिं तन्वती
करोतु मम शं तनोः सपदि शंतनोरङ्गना ॥ ४९ ॥

वामन पंडित—

सुमंद हसितें स्फुरे वदनदीप्ति पीयूषसी
तिनें निववि मानवा भवदवाग्नितप्ता कशी ।
धरी विशदचित्प्रभामय अपूर्व रूपा तया
करू मम सुखी तनू त्वरित शंतनूची प्रिया ॥ ४९ ॥

ल. गो. विंझे—

जिच्या वदनकांतिच्या मधुरमंद हास्यामृतें
भवज्वलनिं पोळल्यांस नित देत जी शांतितें ।
जिचा खुलत देह चिन्मय विधुप्रकाशापरी
करो तनु सुखीच शंतनुसखीच ती सत्वरी ॥ ४९ ॥

अर्थ : मृदुस्मितानें फुललेल्या, स्वतःच्या मुखाच्या कांतिरूपी अमृतानें, जी संसाराग्नीनें पोळलेल्या मानवाचें सतत तापहरण करते, व चैतन्यरूपी चांदण्याचा सर्व चमत्कार जी प्रकट करते, अशी शंतनूची पत्नी [ गंगा ] माझ्या तनूचें कल्याण करो.

—— ० ——

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. 58008 वि: काव्य ५१ 2704 9/3/51

जगन्नाथ पंडित—

शार्दूलविक्रीडित

मन्त्रैर्मीलितमौषधैर्मुकुलितं त्रस्तं सुराणां गणैः
स्रस्तं सान्द्रसुधारसैर्विदलितं गारुत्मतैर्ग्रावभिः ।
वीचिक्षालितकालियाहितपदे ! स्वर्लोककल्लोलिनि !
त्वं तापं तिरयाधुना मम भवज्वालावलीढात्मनः ॥ ५० ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे दा. क्र. 12497 (स्थळ प्रत)

वामन पंडित—

मंत्रां मौन पडे, महौषधिगती संकोचल्या; देवही—
त्रस्त; स्रस्त सुधारसाख्य, गरुडग्रावा थके भीमही ।
हे मंदाकिनि ! कालियास दमिता; धूसी पदां त्याचिया
आतां तूं भवनागदंशजनिता तापा हरी माझिया ॥ ५० ॥

ल. गो. विंझे—

झाल्या औषधि फोल, मंत्रहि मुके, भ्याले सुरांचे गण
गेल्या सांद्र सुधा गळून, नि शिला गारुत्मती भंगुन ।
लाटांनीं तव, कालियारिपद तूं प्रक्षाळिले स्वर्धुनि !
ज्वालादग्ध भवाग्निनें मम, अतां ने ताप तूं वाहुनी ॥ ५० ॥

अर्थ : हे स्वर्गंगे ! माझ्या भवरोगहरणाच्या बाबतींत मंत्र मुके झाले; औषधांनीं आपला प्रभाव मिटून घेतला; सारे देव भयभीत झाले; अमृतांचा जीव गळून गेला; आणि विषघ्न गारुत्मती शिलासुद्धां भंगून गेल्या. हे आई ! तूं पूर्वी, कालियाचा शत्रु जो विष्णु [ कृष्ण ] त्याचे पाय, आपल्या लाटांनीं, जसे धुतलेस, तद्वत्, आतां, भवाग्नीच्या ज्वालांनीं पोळलेल्या माझाहि, ताप शांत कर.

**जगन्नाथ पंडित—**

स्रग्धरा

द्यूते नागेन्द्रकृत्तिप्रमथगणमणिश्रेणिनन्दीन्दुमुख्यं
सर्वस्वं हारयित्वा स्वमथ पुरभिदि द्राक् पणीकर्तुकामे।
साकूतं हैमवत्या मृदुलहसितया वीक्षितायास्तवाम्ब!
व्यालोलोल्लासिवल्गल्लहरिनटघटीताण्डवं नः पुनातु ॥ ५१ ॥

**वामन पंडित—**

द्यूतीं, चर्मा द्विपाच्या, प्रमथगण, मणी, नंदि, चंद्रादि सारीं
हारी सर्वस्व अंबा; मग पणिं अपणा घालुं इच्छी पुरारि।
ऐशा संधीस तूतें विहसुनि मिरवी पार्वती गूढभावें
क्रोधोर्मी नित्य लीला नटविसि तधिं तें रक्षु आम्हां प्रभावें ॥ ५१ ॥

**ल. गो. विंझे—**

द्यूतीं नागेंद्रचर्म, प्रमथगण, शशी, नंदि, रुद्राक्षमाला
जातां सारें, पणातें पुरमथन जधीं लावुं इच्छी स्वतांला।
"लावा गंगा पणाला" जणुं म्हणत बघे, पार्वती जैं हंसून
लाटांच्या तांडवा ज्या करिसि तधिं, अम्हां तें करो पापहीन ॥ ५१ ॥

**अर्थ :** माते! शंकरपार्वती द्यूत खेळत असतां, शंकराचें हस्तिचर्म, प्रमथगण, रुद्राक्षमाळ, नंदी, चंद्र, इत्यादि सारें कांहीं, पार्वतीनें जिंकून घेतल्यावर "मी स्वतःलाच पणाला लावतों" अशी इच्छा शंकरानें दर्शवितांच, "अजून गंगा पणाला लावायची राहिली आहे, ती लावा कीं," अशी अर्थपूर्ण दृष्टि, हळूच हंसून, पार्वतीनें तुझ्यावर टाकतांच तूं [संतापून] लाटांचें जें थैमान तांडव केलेंस, तें आम्हांस पवित्र करो.

—— ० ——



श्लोक ५१

द्यूते नागेन्द्र ...

जगन्नाथ पंडित—

उपजाति

विभूषितानङ्गरिपूत्तमाङ्गा
सद्यः कृतानेकजनार्तिभङ्गा।
मनोहरोत्तुङ्गचलत्तरङ्गा
गङ्गा ममाङ्गान्यमलीकरोतु ॥ ५२ ॥

वामन पंडित—

करी अलंकार शिवोत्तमांगीं
स्नानें जगाचे अघशैल भंगी।
अपूर्व शोभा जिचिया तरंगां
गंगा अशी पूत करू ममांगां ॥ ५२ ॥

ल. गो. विंझे—

जी भूषवी उच्च शिवोत्तमांग
करी क्षणीं जी जनतापभंग।
मनोज्ञ उत्तुंग जिचे तरंग
गंगा करो निर्मल ती ममांग ॥ ५२ ॥

अर्थ : मदनरिपु शिवाचें उत्तमांग भूषित करणारी ; अनेकांच्या दुःखांचा त्वरित नाश करणारी; जिच्या लाटा सुंदर व उंच उडत आहेत, ती गंगा माझीं अंगें निर्मल करो.

—— ० ——

जगन्नाथ पंडित—

अनुष्टुभ्

इमां पीयूषलहरीं जगन्नाथेन निर्मिताम् ।
यः पठेत्तस्य सर्वत्र जायन्ते सुखसंपदः ॥ ५३ ॥

वामन पंडित—

लहरी अमृताची ही जगन्नाथकवीकृता ।
जो पठे त्यासि सर्वत्र होतील सुखसंपदा ॥ ५३ ॥

ल. गो. विंझे—

पीयूषलहरी केली जगन्नाथें; पठेल ही —
जो, त्या सर्वत्र लाभेल सुख, संपत्ति, या महीं ॥ ५३ ॥

अर्थ : जगन्नाथकवीनें रचिलेली, ही पीयूषलहरी, जो कोणी पठन करील त्यास सर्वत्र सुख आणि संपत्ति यांचा लाभ होईल.

———— ० ————

# गंगालहरी : श्लोकांच्या आद्याक्षरांची सूचि—


| आद्याक्षरें | श्लोक क्रमांक | आद्याक्षरें | श्लोक क्रमांक |
|---|---|---|---|
| अनाथः स्नेहार्द्रां | २४ | प्रभाते स्नातीनां | ७ |
| अपि घ्नन्तो विप्रा० | ३४ | बधान द्रागेव | ४७ |
| अपि प्राज्यं राज्यं | ६ | भवत्या हि व्रात्या० | ३७ |
| अलभ्यं सौरभ्यं | ३५ | मन्त्रैर्मीलित० | ५० |
| अविश्रान्तं जन्मा० | ४५ | मरुल्लीलालोल० | २० |
| इदं हि ब्रह्माण्डं | २७ | महादानैर्ध्यानैः | ११ |
| इमां पीयूष० | ५३ | यजन्त्येके देवा० | ४४ |
| उदञ्चन्मात्सर्य० | ३ | यदन्तः खेलन्तो | ९ |
| कपर्दादुल्लस्य | ४० | ललाटे या लोकैः | ४२ |
| कियन्तः सन्त्येके | ३६ | विधत्तां निःशङ्कं | २३ |
| कृतक्षुद्रैनस्का० | १७ | विनिन्द्यान्युन्मत्तैः | १३ |
| जडानन्धान् | १५ | विभूषितानङ्ग० | ५२ |
| तवालम्बादम्ब ! | ४ | विमानैः स्वच्छन्दं | ३३ |
| त्रपन्ते तीर्थानि | २८ | विलीनो वै वैव० | २५ |
| दरस्मितसमु० | ४९ | विशालाभ्यामाभ्यां | ३२ |
| दरिद्राणां दैन्यं | २ | शरच्चन्द्रश्वेतां | ४८ |
| द्युते नागेन्द्र० | ५१ | श्वपाकानां व्रातैः | २९ |
| न कोऽप्येतावन्तं | ३० | श्ववृत्तिव्यासङ्गो | ३१ |
| नगेभ्यो यान्तीनां | २२ | सदैव त्वय्येवा० | ३९ |
| न यत्साक्षाद्वेदैः | १० | समुत्पत्तिः पद्मा० | २१ |
| नरान्मूढान् | ४३ | समृद्धं सौभाग्यं | १ |
| निधानं धर्माणां | १८ | स्खलन्ती स्वर्लोका० | १४ |
| नृणामीक्षामात्रा० | १२ | स्फुरत्कामक्रोध० | २६ |
| पयः पीत्वा मातः | ४६ | स्मृतं सद्यः स्वान्तं | ८ |
| पुरो धावं धावं | १९ | स्मृतिं याता पुंसा० | ५ |
| प्रदोषान्तर्नृत्य० | ३८ | स्वभावस्वच्छानां | १६ |
| प्रपद्यन्ते लोकाः | ४१ | | |

ल. गो. विंझेकृत गंगालहरी. दुसरी आवृत्ति.

प्रथमावृत्तीपेक्षां या आवृत्तींत केलेल्या फेरफारांचें

## स्पष्टीकरण

[ प्र. आ. = प्रथम आवृत्ति; मू. सं. = मूळ संस्कृत ( जगन्नाथाचा ) श्लोक; वा. पं. = वामन पंडितांचा श्लोक; ल. विं. = विंझेकृत मराठी श्लोक; ग. = गद्यार्थ. दु. आ. = दुसरी आवृत्ति. ]

**श्लोक** १ मू. सं. मध्यें "सुधासोदर्यं," ऐवजीं "सौंदर्यं" असा पाठ आहे, परंतु अमृतासारखें सौंदर्य म्हणण्यापेक्षां, सख्ख्या भावासारखे ( सोदर्य ) सर्व गुण असलेलें तुझें जल, हें म्हणणें अधिक समर्पक. वा. पं. प्र. आ. मध्यें "अशेषा भूतींचें" होतें. त्याचा अर्थ "सर्व सृष्ट पदार्थांचें" असा अतिव्याप्त होत होता. मू. सं. मधील "वसुधा" याचा समानार्थक "भूमीचें" हा पाठ यास्तव स्वीकारला. प्र. आ. ल. विं. मध्यें दुसऱ्या ओळींतील "भूषण" पेक्षां "वैभव" हा "महैश्वर्य" ला अधिक जवळ शब्द दु. आ. मध्यें वापरला; प्र. आ. ल. विं. तिसरी ओळ— "श्रुतींचें जें सार, त्रिदशसुकृतें मूर्त जणुं जें" अशी होती, तींत "सुकृतें" हें अनेकवचन नको होतें. म्हणून प्रस्तुत बदल केला. त्यांत "प्रकट" या शब्दानें "अमूर्ताचें मूर्त" हा अर्थ आला. दु. आ. ग. मध्यें भूषणऐवजीं वैभव म्हटलें आहे.

**श्लोक** २ प्र. आ. मू. सं. मध्यें ३ ऱ्या ओळींत "द्रागाविद्या" या ऐवजीं आतां "द्रागाविद्य" हा पाठ घेतला; कारण, द्राक् + अविद्या = द्रागविद्या होईल. द्राक् + आविद्या यांत अर्थाची ओढाताण होते.

त्यापेक्षां अविद्यायाः भावः = आविद्यम्, असा अर्थ घेऊन "द्रागाविद्य" असें रूप घेतलें. प्र. आ. ल. विं. मध्यें पहिली ओळ– "दरिद्रांचें दैन्य, द्रुत कुमतिचें पापहि हरी" अशी होती, तींत कुमति हें एकवचन नको होतें; म्हणून प्रस्तुत ओळ, "दरिद्रांचें दैन्य, द्रुत दुरित दुष्टांतिल हरी" अशी केल्यानें अनेकवचनहि आलें, व 'द' अक्षर ६ वेळ व 'त' ३ वेळ येऊन अनुप्रासहि साधला. प्र. आ. ल. विं. चौथी ओळ "जलौघ श्री देवो अमितचि अम्हां तो महिवरी" होती. त्यांत चि पादपूरक व आम्हां ऐवजीं अम्हां हे दोन दोष होते ते प्रस्तुत ओळीनें दोन्ही निघून गेले.

श्लोक ३ प्र. आ. मू. सं. मध्यें पहिली ओळ – "उदञ्चन्मार्तण्डस्फुट-कपटहेरम्बजननी—" अशी होती. पैकी 'मार्तण्ड' ऐवजीं 'मात्सर्य' असा पाठ वामनांनीं घेतला. पण, स्फुटकपट कशाचें? याचा नीट अर्थ लागत नाहीं. म्हणून सर्वच ओळ प्रस्तुतप्रमाणें बदलली आहे. व प्र. आ. ल. विं. पहिल्या दोन ओळी — "असूयेनें होतां सतिनयन बालार्कसम ते! कटाक्षांनीं त्यांच्या.." याऐवजीं नवीन पाठाला अनुसरून बदल केला आहे. प्र. आ. वा. पं. मधील "उदेला मात्सर्यें" बदलून "उदेल्या मात्सर्यें" घेतलें. मू. सं. तिसऱ्या ओळींत 'गङ्गातनुभुवः' ऐवजीं 'गाङ्गाः पुनरमी' असा एक पाठ आहे. पण त्यामुळें नवीन कांहीं अर्थ निघत नाहीं.

श्लोक ४ मू. सं. प्र. आ. मध्यें "निराधारो हा! रोदिमि कथय केषामिह पुरः?" अशी चौथी ओळ होती. त्यांत 'धारो' व 'हा! रो' हा अनुप्रास साधे; पण यतिभंग 'रो। दिमि' असा होई.

म्हणून प्रस्तुत पाठ घेतला. प्र. आ. ल. विं. तिसऱ्या ओळींत “ अनास्थेनें आतां ” होतें, त्यांत, अनास्थेपेक्षा ‘ उदासीना’च मूळार्थवाहक, म्हणून बदल केला.

श्लोक ५ मू. सं. दोन्ही आवृत्तींत चन्द्रांशुसरणिः हाच पाठ ठेवला. कारण ‘ तंद्रा ’ व ‘ चंद्रा ’ हा अनुप्रास जगन्नाथाच्या ठराविक ठेक्यांपैकीं आहे. वा. पं.नीं चण्डांशु असा पाठ घेतल्यानें सविता असें भाषांतर केलें तें योग्यच. प्र. आ. ल. विं. दुसऱ्या ओळींत ‘ अकृतसुकृतां-च्याहि ’ असा मूळाप्रमाणें संस्कृत समास होता त्याचें मराठीकरण प्रस्तुत ओळीनें केलें. मू. सं. मध्यें, ‘ त्रिविधमथ ’ ऐवजीं ‘ त्रिविध-मपि ’ असा पाठ आहे; पण तो विशेष नवीनार्थोत्पादक नाहीं.

श्लोक ६ मू. सं. प्र. आ. मधील चौथ्या ओळींतील ‘ जनानां ’ यांतील ‘ जन ’ दुसरे कोणी नसून, राज्य सोडून येणारे राजेच असल्यानें, सरळ “ नृपाणां ” हा नवा पाठ स्वीकारला. प्र. आ. ल. विं. ३–४ ओळी—“ सुधेपेक्षां गोडें जल पिउनि जैं तृप्त बनती । तदा त्या आनंदापुढतिं जन मोक्षास हंसती ॥ ” अशा होत्या, त्यांतील गोडें हा शब्द फारच प्राकृत व काव्यांत न शोभणारा होता. पण, स्वादूच ठेवला, तर, वा. पं. ची सरळ नकल होते; म्हणून नाइलाजानें, ‘ गोडें ’ हा शब्द पत्करला होता. पण नव्या दोन ओळींनीं त्या दोषाचा परिहार झाला.

श्लोक ८ मू. सं. चौथ्या ओळींत ‘ प्राणप्रान्ते वदन° ’ या ऐवजीं प्राण-प्रान्तर्वदन° ’ असा पाठ आहे, पण तो थोडा सदोष असून नवीनार्थोत्पादक नाहीं. पण त्यामुळें ‘ प्रान्तर्, ’ व ‘ लान्तर्, ’ हा अनुप्रास होऊं शकतो.

श्लोक ९ मू. सं. मधील ' तीरं ' बदलीं ' नीरं ' पाठ आहे. व तो ' यदन्तः ' (' ज्याच्यांत ') याच्याशीं जास्त जुळता आहे; पण, ' निवासात्, ' म्हणजे, कोणी 'पाण्यांत राहतात' म्हणण्यापेक्षां, ' तीरावर राहतात ' हें म्हणणें जास्त समर्पक; म्हणून, ' तीरं ' पाठच ठेवला. ' निवासात् ' ' म्हणजे गंगेच्या या जगांतील निवासामुळें ' ? (हा अर्थ स्पष्टपणें श्लो. २५; श्लो. ३३, श्लो. ४३ मध्यें अभिप्रेत आहे) कीं, ' मोक्षेच्छु लोकांच्या गंगातटींच्या निवासामुळें ' ? (हा अर्थ श्लोक ६ मध्यें अभिप्रेत आहे.) वा. पं. नीं ' निवासें ' हा शब्द वापरून मूळचा मोघमपणा कायम ठेवला. मीं पहिला अर्थ घेतला. पण, जर दुसरा अर्थ निघावयास हवा असेल, तर माझी तिसरी ओळ— " रहातां जेथें, जें जनिमरणदुःखा हरितसे " अशी धरून कविता वाचावी.

श्लोक १० मू. सं. चौथ्या ओळींत प्र. आ. मध्यें ' तत्त्वं, न विषयः ' असें होतें, त्याचा नीट समाधानकारक अर्थ लागत नव्हता. त्याऐवजीं ' न विशयः ' म्हणजे ' न संशयः ' हा पाठ स्वीकारला. वा. पं. नीं विषयः पाठ स्वीकारला, पण, भाषांतर दुर्बोध झालें. प्र. आ. ल. विं ३–४ ओळी " तमा नाशी तेजें, सुविमल, निराकार, चिर गे । असें जें तें तूंची, न विषय कधीं, तत्त्व सुभगे " ॥ होत्या. नवीन पाठास अनुसरून त्या प्रस्तुतप्रमाणें बदलल्या.

श्लोक ११ प्र.आ. मू. सं. दुसऱ्या ओळींत " न लभ्यं घोराभिः सुविमल-तपोराशिभिरपि " यांत ' घोरा ' व ' पोरा ' हा अनुप्रास साधत होता; पण ' राशि ' शब्द पुंल्लिंगी; त्याचें विशेषण ' घोराभिः ' हें स्त्रीलिंगी होत होतें; तें टाळण्यासाठीं, ' यद् घोरैः ' हा पुंल्लिंगी

पाठ घेतला. प्र. आ. ल. विं. १ ली ओळ " महादानें ध्यानें व्रत, विधि, किती आचरुनियां " होती. तीऐवजीं, मूलार्थाला अधिक जवळ, म्हणून, प्रस्तुतप्रमाणें बदलली.

श्लोक १२ मू. सं. 'अमर्षम्लानायाः' ऐवजीं 'अमर्षग्लानायाः' असा पाठ आहे, पण त्यांत विशेष कांहीं नाहीं. मू. सं. पहिल्या ओळींतील 'ईक्षा' कोणाची? गंगेनें माणसावर कृपादृष्टि टाकणें ही, कीं, माणसानें तिचें दर्शन घेणें ही? वा. पं. नीं दुसरा अर्थ घेतला आहे. प्र. आ. मध्यें 'कटाक्षानें ही जी...' अशी पहिली ओळ मीं लिहिली व पहिला अर्थ घेतला होता. पण दोन्ही अर्थ ( गंगेनें माणसाला व माणसानें गंगेला पाहणें ) निघावेत, ही सोय प्रस्तुत 'पहाण्यानेंही जी' या शब्दांनीं झाली आहे.

श्लोक १३ मू. सं. मध्यें "उन्मत्तांनीं निंदावीं" "पतितांनीं टाळावीं" अशीं तृतीयेच्या कर्त्यांचीं चार रूपें आहेत. प्र. आ. ल. विं. " जया निंदी उन्मत्तहि, परिहरी ज्या पतितही। न बोलावीं व्रात्यीं, त्यजिति भयकंपें पिशुनही " अशा ओळी होत्या. त्यांत तृतीयेचा कर्ता एकच आला. प्रस्तुतांत ३ आले. पण प्रयत्न करूनहि चौथा जमला नाहीं. मू. सं. मध्यें 'कदाप्यश्रान्ता' ऐवजीं 'तथाप्यश्रान्ता' असा एक पाठ आहे. दोन्ही चांगले आहेत.

श्लोक १४ प्र. आ. ल. विं. पहिली ओळ "जधीं येशी स्वर्गांतुनि अवनिच्या शोकहरणीं " अशी होती. त्यांत स्वर्गां--तुनि हा यतिभंग व 'अवनीच्या' ऐवजीं 'अवनिच्या' हा शुद्धलेखन

दोष होता. ते दोन्ही टाळून नवीन ओळींत, लोकहितासाठीं, तूं, स्वतःचें, स्वर्गाच्या उच्चस्थानापासूनचें पतनहि पत्करलेंस. (मू. सं. मधील ' स्खलन्ती ' हा शब्द पहा ) हा अर्थ स्पष्ट आणला.

श्लोक १५ प्र. आ. वा. पं. मध्यें ' ग्रहद्वेषी ' हा शब्द चुकीचा होता. वा. पं. ना अन्याय होऊं नये म्हणून स्वकल्पनेनें ' ग्रहक्लेशी ' शब्द घातला प्र. आ. ल. विं. मध्यें ' अघनशनि ' होतें त्याऐवजीं ' अघहननि ' घातलें.

श्लोक १७ मू. सं. मध्यें ' कृतक्षुद्रैनस्कान् ' ऐवजीं, ' कृतक्षुद्राघौघान् ' असा दुसरा पाठ आहे. तो, किंवा--' नरानूरीकर्तुं ' ऐवजीं, ' नरानङ्गीकर्तुं, ' घेतल्यानें, निराळा अर्थ निघत नाहीं. 'नरान्दूरीकर्तुं' असाहि पाठ आहे त्यांत "नरान् (तेषां पापात्) दूरीकर्तुं असें अध्याहृत घ्यावें लागतें. त्याची आवश्यकता नाहीं. "त्वमिव जननि! त्वं विजयसे" याऐवजीं "त्वमिह खलु जागर्षि जगति" या पाठांत विशेष नवा अर्थ नाहीं, व पहिल्या पाठांतील "त्वमिव त्वं" ("तुझ्यासारखी तूंच") हा अनन्वय अलंकार हातचा सोडवत नाहीं. प्र. आ. ल. विं. १ ल्या ओळींत ' उपरति ' शब्दाऐवजीं पश्चात्तापाला अधिक जवळचा ' अनुशय ' शब्द द्वितीयावृत्तींत घातला.

श्लोक १८ प्र. आ. वा. पं. दुसऱ्या ओळींत सुचिर ( चांगलें वस्त्र ); जीची (= जी स्वयेंच), असा अर्थ निघत होता, पण वस्त्र या अर्थी 'चीर' मध्यें दीर्घ 'ची' पाहिजे, म्हणून श्री. नवरे यांनीं सुचविलेला ' रुचिर चीर ' असा पाठ घेतला. प्र. आ. ल. विं. ३ ऱ्या ओळींत ' अधियां ' या अर्थी ' कुबुद्धी ' शब्द होता.

त्याहून ' अबुद्धी ' हा मूळार्थास अधिक निकटचा शब्द घेतला. ( पहा भर्तृ. स्वायत्तामाच्छादनमज्ञतायाः । )

श्लोक २० मू. सं. मधील रेणूचा तवंग पाण्यावर कुंकवासारखा तरंगतो, या अर्थाला जुळण्यासाठीं, प्र. आ. ल. विं. दुसरी ओळ " गळे रेणू, त्यानें जल दिसत जें कुंकुमपरी " या ऐवजीं " गळे रेणू, भासे, जणुं, जळिं तरे कुंकुम वरी " अशी केली. तिसऱ्या ओळींत " सुरस्त्रीवक्षींचें अगरुयुत " होतें, त्याबद्लीं ' सुरस्त्री-वक्षींच्या अगरुसह ' असे शब्द घातले. चौथ्या ओळींतला " भवज्जाला " हा शब्द व्याकरणदृष्ट्या अशुद्ध होता. म्हणून ' भवाच्या जालातें ' हा बदल केला.

श्लोक २१ मू. सं. ३ ऱ्या ओळींत " व्यासङ्गो हतपतित " याऐवजीं " व्यासङ्गः पतितजन " या पाठानें विशेष निराळी अर्थोत्पत्ति होत नाहीं. मू. सं ४ थ्या ओळींत "जगति" ऐवजीं "जगतः" हा पंचमीचा शब्द घेतल्यास " साऱ्या जगापेक्षां तुझाच महिमा कां न जागो ?" असा अर्थ होईल. मग त्यास जुळण्यासाठीं माझ्या प्रस्तुतच्या श्लोकाच्या शेवटच्या दोन ओळी — " तरी तूं तारीशी हतपतित ऐशी नृ-सरणी । न कां जागो पृथ्वीहुनि तवचि उत्कर्ष ! जननि ! " अशा घेतां येतील.

श्लोक २२ मू. सं. मध्यें ' कया वा ' ऐवजीं ' कया च ' हाहि पाठ तितकाच चांगला आहे. प्र. आ. वा. पं. ४ थी ओळ — " जियेतें योजावें जव तुज न लेशाप्रति मिळे " अशी दुर्बोध होती. श्री. जोशी यांच्या सूचनेनें ती प्रस्तुतप्रमाणें बदलून मूळ संस्कृतला जास्त जवळ आणण्याचा यत्न केला आहे. प्र. आ. ल. विं. चौथी ओळ

"कसें साम्याभावें तुलन कविला येइ करितां?" यापेक्षां प्रस्तुत ओळ, मूळार्थाला पुष्कळच जवळ आणली आहे.

**श्लोक** २३ मू. सं. श्लोकाशेवटीं "जननी" ऐवजीं "भवती" व "जागर्ति जननी" ऐवजीं "जागर्षि जननि!" यापैकीं दुसरा पाठ स्वीकारला आहे. प्र. आ. ल. विं. मध्यें दुसऱ्या ओळींत "सुखें झोंपो शेषीं हरि" असे शब्द होते. शेषीं मूळाबाहेरचा म्हणून त्याज्य. मूळांत "सुखं शेते? शेतां" "सुखानें निजला आहे ना? निजो;" असा अर्थ "सुखें झोंपे? झोंपो" या शब्दांनीं आणला आहे. श्लोक २३ मू. सं. मध्यें "सुखं शेषे शेतां" असाहि पाठ आहे तो घेऊन वा. पं. नीं 'निजो शेषीं सौख्यें' असें भाषांतर केलें आहे.

**श्लोक** २४ मू. सं. मध्यें "विगलितगतिः" होतें त्याऐवजीं "विदलितगतिः" हा पाठ स्वीकारला आहे. (पहिल्या व दुसऱ्या दोन्ही ओळींत तोच तोच "विगलित" बरा दिसत नाहीं.)

**श्लोक** २५ प्र. आ. ल. विं. ३ व ४ या ओळी — "विमानांची दाटी सुरपुरिं दिसे, ज्या अवसरीं-कथा हा कल्याणी तव अवतरे या महिवरी!!" याऐवजीं स्वर्गांत "traffic jam" उत्पन्न झाला या अर्थीं प्रस्तुत बदल करून **गर्दी** व **मर्दी** हा जगन्नाथप्रिय अनुप्रास साधला आहे.

**श्लोक** २६ प्र. आ. मू. सं. तिसऱ्या ओळींत 'कमपि' ऐवजीं 'तमपि' हा पाठ स्वीकारला आहे.

**श्लोक** २८ मू. सं. मध्यें तिसऱ्या ओळींतील —'त्वमियमनुकम्पार्द्रहृदये' ऐवजीं 'त्वमपि करुणापूर्णहृदये' घेतल्यानें, विशेष फरक पडत

नाहीं. ल. विं. दुसरी ओळ, यांतील 'महादेवप्रभृति' यांतील 'प्र' या जोडाक्षरामुळें, आघात येऊन, 'व' हा दीर्घ होऊन, छंदोभंग होतो; हें खरें आहे. पण, मराठींत हा नियम कांटेकोरपणें पाळीत नाहींत. शुद्धतेसाठीं ही ओळ — "करें कर्णा शंभुप्रभृति सुरही बंद करिती' अशी करून, मी या आवृत्तींत घालणार होतों, पण "कानांवर हात ठेवतात" यांतला विशेषार्थ त्यांत नीटसा येत नाहीं. म्हणून जुनीच ओळ ठेवली.

श्लोक २९ प्र. आ. ल. विं. पहिली ओळ "करावें कीं नाहीं! म्हणुनि अतिनीचें त्यजियलीं" अशी होती. त्यापेक्षां प्रस्तुत आवृत्तींतील ओळ मूळ संस्कृतला अगदीं जवळ आणली आहे. चौथ्या ओळींत प्र. आ. मध्यें "क्षुद्र नर हा!" याऐवजीं, 'नर-पशु' या संस्कृतांत, 'क्षुद्रता' अभिप्रेत नाहीं, 'मूर्खता' आहे, असें वाटल्यानें 'मूढ' शब्द योजिला.

श्लोक ३० प्र. आ. मू. सं. चौथी ओळ यांत शेवटीं "प्रणय नः" म्हणजे "आम्हांला पुढें ने — (सद्गति दे)" असें होतें त्याऐवजीं "प्रणयतः" घेऊन त्याचा संबंध "संप्राप्तोऽहं" शीं जोडणें योग्य दिसतें. "प्रणयतः" पाठ स्वीकारल्यानें ल. विं. चौथी ओळ अर्थातच योग्य रीतीनें बदलली आहे.

श्लोक ३२ मू. सं. तिसऱ्या ओळींत "जननि! मनुजस्य" या ऐवजीं "मनुजहतकस्य" असा एक पाठ आहे. वा. पं. (३ री ओळ) अधमनरकर्णाकृति या शब्दावरून, त्यांनीं, 'मनुज-हतकस्य' हा पाठ घेतलेला दिसतो.

श्लोक ३३ मू. सं. चौथ्या ओळींत — "न यत्र त्वं लीलादलितमनुजाशेष-

कलुषा " याऐवजीं "न यत्र त्वल्लीला दलितमनुजाशेष-कलुषा " हा पाठ घेतल्यानें "जेथें तूं नाहींस " याऐवजीं "जेथें तुझी लीला नाहीं " हा अर्थ निघतो. वा. पं. नीं दुसरा घेतलेला दिसतो. कांहींहि म्हटल्यानें महत्त्वाचा फरक होत नाहीं.

श्लोक ३४ मू. सं. दुसऱ्या ओळींत "पुनरपि हरन्तश्च " ऐवजीं "पुनरपहरन्तश्च;" व चोथ्या ओळींत 'उपर्यम्ब' ऐवजीं 'उपर्येव' असे पाठभेद आहेत, त्यामुळें अर्थांत महत्त्वाचा फरक होत नाहीं. प्र. आ. ल. विं. शेवटच्या दोन ओळी — "शवा त्वत्स्रोतीं, त्यां अखिलसुरसन्मानित असें। न दानें यज्ञेंही सुलभ, पद मोठें मिळतसे ॥" अशा होत्या; त्यांतून दान व यज्ञ करणाऱ्यांना मिळतें त्याहून वरचें असा स्पष्टार्थ निघत नव्हता म्हणून प्रस्तुत बदल.

श्लोक ३५ मू. सं. दुसऱ्या ओळीच्या शेवटीं 'क्षतहृदाम्' याऐवजीं 'क्षतभृताम्' असा पाठ आहे तो महत्त्वाचा नाहीं. प्र. आ. ल. विं. ४ थ्या ओळींत 'पुनित' होतें त्याऐवजीं 'विमल' घातलें आहे.

श्लोक ३६ कित्येक टीकाकारांनीं मू. सं. मध्यें "नियतमिह लोकार्थ-घटकाः " असें तोडून "कित्येक लोक, या जगीं, लोकांच्या सेवेस वाहून घेतात " असा अर्थ लावला आहे. पण "कांहीं लोक, या लोकापुरते [ इहलोक ] व कांहीं परलोकापुरते प्रयत्न करतात, पण जगन्नाथ मात्र दोन्ही लोकांचा भार तुझ्यावर टाकतो, " या संदर्भात पाहिलें म्हणजे इह आणि लोक तोडून

चालणार नाहीं. वा. पं. नीं माझ्याप्रमाणेंच अर्थ लावला आहे.

श्लोक ३८ प्र. आ. वा. पं. तिसऱ्या ओळींत 'तो तोच डमरू' ऐवजीं 'जो तोच डमरू' असा उचित फरक केला आहे. प्र. आ. ल. वि. चौथ्या ओळींत 'तव हें तांडव असें' ऐवजीं (सूचक श्री. जोशी) "तव तें तांडव तसें" घालून मूळच्या ४ 'त' कारांत २ ची भर अनुप्रासासाठीं घातली.

श्लोक ४० मू. सं. मधील "प्रणयमिलदर्धाङ्गयुवतेः" हें पुंलिंगी रूप घेऊन, तें पुरारेः याला जोडून, व मृदुलतरसीमंतहि शंकराचेंच असें धरून, जटांतून गंगेच्या लाटा, प्रणयरत आहे अर्धांगयुवति ज्याची, अशा, शंकराच्या कपाळावर पसरल्या; व, त्या पार्वतीनें आपल्या हातानें निपटून काढल्या, असा अर्थ, कांहीं टीकाकारांनीं लावला आहे. नाहीं तरी शंकराच्या जटांत गंगा आहेच; ती त्याच्या कपाळावर आली, तर, पार्वतीला एवढा राग कां? मृदुलतरसीमंत हें विशेषण शंकरापेक्षां पार्वतीलाच सुयोग्य, पार्वतीच्या स्वतःच्या डोक्यावर गंगा आली [दोन्ही अर्थांनीं] म्हणून तिचा सवतीमत्सर उफाळला हेंच म्हणणें योग्य. पण वरील टीकाकारांचा अर्थ ज्यांना ग्राह्य वाटेल त्यांच्यासाठीं पहिल्या दोन ओळी अशा वाचाव्या — "जटांतूनी लाटा, मृदुल शिवभालीं पसरतां। तिथें त्या अर्धांगीं प्रणयरत गौरीस दिसतां।। कराब्जें ती झाडी..." प्र. आ. ल. वि. ३ ऱ्या ओळींत "धरुनि सवतीभाव" होतें, त्याऐवजीं मूलार्थद्योतक "स्फुरत सवतीभाव" हे शब्द घातले आहेत.

श्लोक ४१ मू. सं. मधील "उपाधिः" चा एक अर्थ "पीडा, उपसर्ग" असा देवस्थळी-कोशांत आहे. तेव्हां प्र. आ. ल. विं. "अभीष्टातें देशी म्हणुनिच उपाधी तुज अति।" ही दुसरी ओळ चुकीची नव्हती. पण 'उपाधि' चा अर्थ 'हेतु, कारण' हा येथें जास्त समर्पक वाटतो, म्हणून, ही ओळ "अभीष्टा देशी हा हृदयिं परि ते हेतु (स्वार्थ) धरिती" अशी बदलून, शरणागतांची स्वार्थी भावना स्पष्ट केली. प्र. आ. ल. विं. तिसरी व चौथी ओळ अशी होती- "तुझी घेतों माते! शपथ, मन आत्मा सुरधुनि! स्वभावेंची आहे अमित अनुरागास धरुनी॥" ज्याची शपथ घ्यावयाची, त्याची तृतीया (त्वया शपे) हवी होती. तुभ्यं शपे म्हणजे तुला शपथपूर्वक [तुझी शपथ घेऊन असें नव्हे] सांगतों. यासाठीं, त्या ओळीं बदलून, नव्या, प्रस्तुत घातल्या.

श्लोक ४२ मू. सं. चौथ्या ओळींत "सा मृत्स्ना" ऐवजीं 'सन्मृत्स्ना' असा पाठ आहे. साधी 'माती' न म्हणतां 'चांगली माती' इतकाच अर्थ.

श्लोक ४३ प्र. आ. प्रस्तावनेंत श्री. नवरे यांनीं वा. पं. पहिल्या ओळींच्या शेवटीं 'मरती' हा शब्द चूक ठरविला. पण तो 'मरती' हा शब्दहि योग्यच आहे. पुष्कळ छापील पुस्तकांत 'मरती' असेंच आहे व गंगा नसलेल्या कुदेशांत मूर्ख लोक (मुक्तीविना) मरतात हें गद्यार्थांत दिलेलें वामन पंडितांचें अभीप्सित त्यांनीं ध्यानीं घेतलें नाहीं. 'तो जर तुझ्या वाईटावर आहे तर त्याच्याकडे जातोस कशाला मरायला!" असें आपण म्हणतों.

तसेंच वा. पं. म्हणतात. पण 'रमती' असें मूळांत वा. पं. नीं म्हटलें असणें अशक्य नाहीं. प्र. आ. ल. विं. चौथी ओळ "घडो मैत्री माझी, तटगत तुझ्या त्या तरुंप्रति" यांत 'नः' चें भाषांतर अनेकवचनी 'आम्ही' हवें; 'तरु' चें अनेकवचन हवें व 'तरुंप्रति' यांतील 'प्र' मुळें 'रुं' दीर्घ होऊन छंदोभंग होतो. असे तीन दोष होते. ते सर्व प्रस्तुत नव्या ओळींनें काढून टाकले.

श्लोक ४४ प्र. आ. ल. विं. तिसरी ओळ "परी मी त्वन्नाम स्मरुनि कृतकृत्यार्थ बनुनी' अशी होती. त्यांत थोडा बदल करून, नामा व कामा हा अनुप्रास साधला. अर्थ तोच.

श्लोक ४५ मू. सं. पहिल्या ओळींत मूळपाठ 'सुकृतजन्मार्जनकृतां' या-ऐवजीं 'सुकृतमात्रं कृतवतां' हा नवा पाठ कवितेच्या अर्थास धरून आहे. वा. पं. नीं तोच अर्थ स्वीकारला आहे.

श्लोक ४८ प्र. आ. मू. सं. पहिली ओळ यांत 'शुभ्रालमुकुटां' असा पाठ होता तो अर्थाला चांगलासा नसल्यानें 'शुभ्राङ्क' पाठ घेतला. शुभ्राल (शुभ्र = पांढरा; अल = सर्प) असा पाठ घेऊन त्याचा अर्थ "जिच्या मुकुटावर चंद्रकोर व (तिला बांधण्यास पांढरा सर्प आहे अशी" (मागच्याच ४७ व्या श्लोकांत सर्पाच्या दोरीनें चंद्र मुकुटांत बांधावयाचा उल्लेख आहे.) असा अर्थ घेतल्यास— 'तनू चंद्रश्वेता, सित अल, किरीटीं, शशिकला' अशी ल. विं. पहिली ओळ करतां येईल. परंतु, अल = सर्प हा अर्थ कोशांत सांपडत नाहीं.

श्लोक ४९ प्र. आ. ल. विं. पहिली ओळ "मृदुस्मितयुतें जिच्या वदन-कांतिच्या अमृतें" अशी होती, त्यांत अमृतांतला मृ हा स्वरान्त

असतां, जोडाक्षर समजून, अ वर आघात घ्यावा लागत असे, तो दोष, प्रस्तुत नव्या ओळींत निघून गेला. प्र. आ. ल. विं. चौथी ओळ "करो तनु सुखीच शंतनुसुपत्नि ती सत्वरीं" अशी होती. त्यांत 'च' पादपूरणार्थ, 'सु' निरर्थक, व पत्नि यांतला 'त्नि' ऱ्हस्व हे अशुद्ध. नव्या ओळींत या तिघां-ऐवजीं दोन दोष उरले; पण 'सुखीच'ला 'सखीच' हा अनुप्रास नवीन आला. कांहीं सोडलें तर कांहीं अधिक जोडलें.

श्लोक ५० मू. सं. प्र. आ. मध्यें तिसऱ्या ओळींत "कालियाहतपदे" व चौथ्या ओळींत "भवव्यालावलीढात्मनः" असे शब्द होते त्यांमुळें एका बाजूला "कालियानें डसून जखमी केलेले कृष्णाचे पाय तूं धुतलेस" तसें दुसरीकडे "भवरूपी नागानें डसलेल्या माझे ताप तूं धू" असें म्हणण्यांत कांहीं एक समानार्थकता होती; पण, कालिया होता यमुनेंत, व कृष्णाची जखम यमुनेनेंच धुतली असेल, (गंगेनें नव्हे,) हें ध्यानीं घेऊन, ते दोन्ही पाठ सोडून "कालियाहित" म्हणजे (कालियाचा अहित म्हणजे शत्रु जो विष्णु) असा पाठ तिसऱ्या ओळींत, व "भवव्याला-" ऐवजीं "भवज्वाला" हा पाठ चौथ्या ओळींत स्वीकारून प्र. आ. ल. विं. ३ व ४ ओळी, "कृष्णाचे पद कालियाहत जसें प्रक्षाळिले स्वर्णदे...आतां या भवसर्पदष्टतनुचे ती तूं हरी ताप ते ॥" या ओळी रद्द करून प्रस्तुत ओळी घातल्या प्र. आ. मध्यें स्वर्णदे! हा व्याकरणांत अशुद्ध प्रयोग पडलेला होता तोहि निघून गेला. मू. सं. चौथ्या ओळींत प्र. आ. मध्यें जो "त्वं तापं निरयाधुना" पाठ होता त्याऐवजीं "तिरयाधुना" हा अधिक चांगला पाठ घेतला. प्र. आ. वा. पं.

चौथ्या ओळींत "भवनागदंशतापा" या शब्दांत 'दंश' व 'तापा' यांच्या मध्यें 'जननी' असा शब्द मीं पाहिलेल्या सर्व छापील आवृत्त्यांत आहे. पण त्याऐवजीं (जोशीकल्पित) "भवनागदंशजनिता तापा" असा पाठ घेतला.

श्लोक ५१ प्र. आ. ल. विं. ओळी ३ व ४ अशा होत्या–"लावा गंगा पणाला" सति हंसुनि बवे भाव ऐसा धरून। तेव्हां थैमान् तूं जें करिशि लहरिंचें, तें करो पापहीन ॥ " यांत 'सति' हें ऱ्हस्वान्त म्हणून अशुद्ध; 'लहरींचें' ऐवजीं 'लहरिंचें' असें अनेकवचनी असून ऱ्हस्व हें दुसरें अशुद्ध; व कोणाला 'पापहीन' करावयाचें तें (नः) हें कर्म त्यांत बसूं शकलें नाहीं; हे तीन दोष नव्या ओळींत काढून टाकले आहेत.

श्लोक ५२ प्र. आ. ल. विं. दुसरी ओळ 'आर्ति' चा अर्थ 'पाप' असा चुकून झाला होता. 'बहूंचे पापभंग' हा सापेक्षत्वाचा दोष राहिला होता तो सुधारून घेतला आहे. प्र. आ. तिसऱ्या ओळींत 'अन् उंच' 'ऐवजीं' उत्तुंग' घातलें आहे.

श्लोक ५३ प्र. आ. मध्यें हा मूळ श्लोक, त्याचें वामनी भाषांतर, माझा श्लोक, व, गद्य अर्थ, असें सर्वच छापावयाचें राहून गेलें होतें. ती चूक या आवृत्तींत सुधारली आहे.

## गंगालहरीच्या पहिल्या आवृत्तीवरील कांहीं

# अभिप्राय

"श्री. ल. गो, विंझे यांसी—आपला माझा परिचय नसतां, अनाहूत-पणें हें लिहीत आहें .........

वर लिहिल्याप्रमाणें यांत घेतलेल्या वामनी श्लोकांतील चुका सुधारून घेणें ......... आपल्याहि रचनेंतील चुका वर दर्शविल्याच आहेत. पण मला हें प्रांजलपणें कबूल केलेंच पाहिजे, कीं, यांतील वामनी श्लोक सर्व सुधारून घेऊन, मग, तुलना केली तरी, 'वामनी' टीकेपेक्षां ही 'लक्ष्मणी' [ल. गो. विंझेकृत समश्लोकी] टीका अधिक सरस आहे."

......य. ग. फफे

"माझ्या या आवडत्या [गंगालहरी] स्तोत्राचा तुम्हीं केलेला समश्लोकी समवृत्त अनुवाद पाहून फार समाधान झालें. तुमची ही शिखरिणी वृत्तांतील श्लोकरचना किती प्रसादपूर्ण व गोड आहे! हा अनुवाद आहे, ही गोष्ट नजरेआड करून जर तुमचे श्लोक वाचूं लागलों, तर मराठींत स्वतंत्रपणें रचलेलें एक गोड स्तोत्र आपण वाचीत आहों असाच ग्रह होत जातो. हा अनुवाद असल्याची जाणीव सहसा कुठेंहि होत नाहीं. अनुवादासारखा भासूं नये, ही जी अनुवादाची एक कसोटी, तिला तुमची रचना पूर्णपणें उतरते असें मला वाटतें.

मुळांतील आशय, त्यांतील खाच्याखुच्यांसह अनुवादांत उतरला पाहिजे आणि मुळांत नसलेलें कांहीं अनुवादांत येतां कामा नये ही जी अनुवादाची दुसरी कसोटी, ती फार कठीण आहे. विशेषतः समवृत्त, समश्लोकी अनुवाद या कसोटीला उतरणें अत्यंत दुर्घट, जवळजवळ अशक्यच असतें. या बंधनांत राहून, मुळांतील आशय संपूर्ण, त्यांतील सौंदर्यस्थलांसह, दुसऱ्या भाषेंत उतरणें, हें महान् दिव्यच म्हटलें पाहिजे. वामनपंडितांच्या नांवावर मोडणारी समश्लोकी साधारणपणें मूलानुसारी व सुंदर असूनहि या कसोटीला बरोबर उतरत नाहीं हें मान्य करावें लागतें....

... ... बारीक नजरेनें पाहतां मूळांतला आशय क्वचित् सुटल्यासारखा वाटला, तरी तुमच्या अनुवादाच्या सौंदर्याला बाध येतो, असें मानण्याचें कारण नाहीं. मूलार्थाला विरोधी किंवा विघातक, तुमच्या अनुवादांत कांहीं नाहीं. तुमच्या अनुवादाला मुळाचा गोडवा आहे, आणि प्रसाद तर मुळापेक्षां, कांहीं ठिकाणीं अधिक आहे असें मी म्हणेन.

......... समवृत्त समश्लोकीचें महाबिकट काम इतकें चांगलें साधलें, याबद्दल मनःपूर्वक अभिनंदन."

——— श्री. ना. बनहट्टी

"जगन्नाथ पंडिताच्या गंगालहरी या काव्यानें, रसिक मनाला, विलक्षण मोहिनी घातली आहे. म्हणूनच, वामन पंडितानेंहि या काव्याचा, पद्यमय अनुवाद केला आहे. संस्कृत भाषेंतील अवघड शब्द वामन पंडिताच्या अनुवादांतहि कायम राहिले; व कांहीं ठिकाणीं तर अधिक वाढले. वामन पंडितानें केवळ शब्दालंकारावर भर दिला. श्री. ल. गो. विंझे, हे पद्यमय अनुवाद करण्यांत आतां अत्यंत निपुण झाले आहेत. सोप्या, सुटसुटीत,

१३५१०

सरस मराठी शब्दांची पेरणी ते अनुवादांत करतात. मूळ काव्यांतील अर्थच्छटेची हानि त्यांनीं यत्किंचितहि केलेली नाहीं. मूळांतील अवघड ठिकाणें अनुवादांत सोपीं झालीं आहेत. मराठी भाषाहि रसाळ व मधुर असून मूळ काव्याइतकाच अनुवादहि गुणगुणावासा वाटतो. "

प्रा. डॉ. व. ग. राहूरकर एम्. ए. पीएच्. डी.
उपसंपादक, संस्कृत कोश विभाग, डेक्कन् कॉलेज्. पुणें ६,
प्रधान संपादक— "भारतवाणी"; संपादक "एकता" पुणें.

"प्रत्यक्षं भवन्तः अपरिचिताः। 'पाणपोई' काव्यरूपेण तु पूर्वपरिचिताः। तत्र अनुवादकौशल्यं विलोक्य परं प्रीतः अभवम्। गंगालहरी दृष्टा। आंग्लकाव्यस्य इव संस्कृतकाव्यस्य अनुवादमपि याथार्थ्येन मधुरललित भाषया च कर्तुं भवन्तः समर्थाः इति सुप्रतीतम्। मम प्रसन्नमनसि उत्फूर्तः अभिप्राय :—

श्रीगङ्गालहरी त्वतीव मधुरा नादे तथाऽर्थेपि च
आर्द्रा भक्तिरसेन तामनुवदन् श्लोके च वृत्ते समे।
मातुर्वाचि पदैः सुबोधललितैर्याथार्थ्यपूर्णैस्तथा
नूनं भाति स लक्ष्मणः कविवरो 'विंझे'ऽपरो वामनः॥

—संस्कृत 'सुभाषचरित' काव्य रचणारे...वि. के. छत्रे. कल्याण.

यांशिवाय, श्री. के. वि. गोडबोले, प्रा. रा. श्री. जोग, डॉ. शं. दा. पेंडसे इ. रसिक विद्वानांचे व 'प्रसाद' 'एकता' 'आलमगीर,' इत्यादि अनेक नियतकालिकांचे उत्तम अभिप्राय आहेत.

REFBK-0013510
REFBK-0013510

ग्रंथ
६६०८५ दि:
२२०६ ५।८।७

# दोघा अविस्मरणीय लेखकांचीं पुस्तकें

लहान मुलांनाहि हंसत खेळत नीति शिकविणारा इसाप-
आणि टक्केटोणपे खाऊन नीति सांगणारा भर्तृहरि-
दोघांची आठवण कोणीहि विसरणार नाहीं.

## चतुर इसाप

जीवन
व सचित्र कथा

संपादक
वि. ग. ताम्हणकर
किंमत १२ आणे

## सार्थ नीतिशतक

मूळ संस्कृत, वामनी श्लोक
व मराठी भाषांतर

भाषांतरकार
प्रा. स. गं. मालशे, एम्. ए.
किंमत १० आणे

हीं पुस्तकें मुलांच्या हातीं अवश्य द्या.

सणांची व व्रतांची उपपत्ती काय ? त्यांचें महत्त्व कशासाठीं ?
हें थोडक्यांत पण योग्य तऱ्हेनें समजण्यासाठीं—

## हिंदू सण आणि व्रतें

लेखक : बाळकृष्णतनय

हें पुस्तक प्रत्येक हिंदू विद्यार्थ्यानें अवश्य वाचावें.

तीन रंगी मुखपृष्ठ * किंमत १ रु. * ट. ख. निराळा.

**बलवन्त पुस्तक भाण्डार, गिरगांव, मुंबई ४**



कव्हर-सर्वोदय प्रिंटर्स, मुंबई ४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. [illegible]
अनुक्रम ६६०८५ वि: [illegible]
क्रमांक २२०६ नों. दि. ५।९।५९

# श्री. ल. ग. विंझे यांचे ग्रंथ

१ **इंग्रजी काव्यसूक्तींची पाणपोई**

खंड १ मूल्य ५-००

२ खंड २ मूल्य ७-५०

( इंग्रजींतल्या उत्कृष्ट निवडक सूक्तींचीं मराठी श्लोकबद्ध भाषांतरें )

३ **ऋग्वेदी संध्या, पुरुषसूक्त व परापूजा** मूल्य ०-६२

( यांचें मराठी श्लोकबद्ध भाषांतर )

४ **गंगालहरी** मूल्य १-५०

( मूळ जगन्नाथाचा श्लोक; त्याखालीं वामनी श्लोक; त्याखालीं विंझेकृत समश्लोकी, गद्य अर्थ व पाठभेद चर्चा ) दुसरी आवृत्ति.

५ **संस्कृत-मराठी-सुभाषित-कोश**

खंड १ मूल्य १४-००

६ खंड २ छापत आहे.

( २२०० संस्कृत सुभाषितें; त्यांचें विंझेकृत श्लोकबद्ध भाषांतर; गद्य अर्थ; विषयवार प्रकरणें. सूचीसह )

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण—

**ल. गो. विंझे**, ८२ खटाव बिल्डिंग, लालबाग, मुंबई १२

**बलवंत पुस्तक भांडार**, गिरगांव नाका, मुंबई ४